शनिवार, १९ नोव्हेंबर २०२२
किमत ५ रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी • दैनिक
वर्ष - ०२ • अंक -९९
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

• MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 19 NOVEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | • YEAR-02 • ISSUE-99 • RNI : MAHMAR/2021/82566 • PAGE-08 • PRICE-5

## महत्वाची बातमी

### टीसीने धावत्या रेल्वेतून जवानाला ढकलले

आधुनिक केसरी न्यूज

**बरेली :** भारतीय लष्कराच्या जवानाला तिकीट तपासणीसाठी आलेल्या टीसीने धावत्या रेल्वेतून ढकलून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. बरेली रेल्वे स्टेशनवर घडलेल्या या घटनेत जवानाचा एक पाय निकामी झाल्याचंही समजतं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बरेली रेल्वे स्थानकात गुरुवारी सकाळी फलाट क्रमांक दोनवर दिब्रुगड-नवी दिल्ली राजधानी एक्सप्रेसमध्ये सुपक बुरे नावाच्या टीसीचा भारतीय लष्करात कार्यरत असलेल्या जवानासोबत तिकीटावरुन वाद झाला. या वादात रागवलेल्या टीसीने जवानाला थेट रेल्वेतून खाली ढकलून दिलं. टीसीने दिलेल्या धक्क्यामुळे जवान थेट रेल्वेखाली गेला आणि त्यातच त्याचा एक पाय निकामी झाला आहे. जखमी जवानावर सध्या सैनिकी रुग्णालयात उपचार सुरु असल्याची माहिती एका रेल्वे अधिकाऱ्याने दिली. दरम्यान, रेल्वे पोलिसांनी या घटनेच्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले, फुटेजमधील दृश्यानुसार आरोपी टीसी सध्या फरार झाला असून त्याचा शोध सुरु असल्याची माहिती उत्तर रेल्वेच्या मुरादाबाद विभागाचे वरिष्ठ वित्त व्यवस्थापक सुधीर सिंग यांनी दिली. तर आरोपीविरोधात आयपीसी कलम ३०७ नुसार हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असल्याचं रेल्वे पोलिस स्टेशन अध्यक्ष अजित प्रताप सिंह यांनी दिली आहे.

## दहशतवाद जागतिक समस्या

### पंतप्रधान मोदी : नवी दिल्लीत 'दहशतवादाचा अर्थपुरवठा रोखा' परिषद

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : सर्व दहशतवादी हल्ल्यांवर प्रतिक्रिया देताना सारख्याच तीव्रतेने द्यायला हवी त्यात आवड-निवड करु नये असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. ते राजधानी नवी दिल्लीत 'दहशतवादाचा अर्थपुरवठा रोखा' या विषयावरील एका परिषदेला संबोधित करत होते. दहशतवाद ही जागतिक समस्या आहे, त्याचा सामनाही आंतरराष्ट्रीय समुदायाने एकात्मिक पद्धतीने करायला हवा, कोणत्या देशात दहशतवाद आहे किंवा दहशतवादी कारवाया कुठे झाल्यात यावरुन त्यासंबंधीची प्रतिक्रिया ठरता कामा नये असेही ते म्हणाले. जगभरात कुठेही, कसाही दहशतवादी हल्ला झाला तर तो दहशतवादी हल्ला आहे, हे ध्यानात ठेऊनच त्यावरील प्रतिक्रिया यायला हवी, हे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ठामपणे सांगितले.**



अनेकदा दहशतवादी हल्ला किंवा कारवाई कुठे झालीय, यावर त्याची प्रतिक्रिया ठरते. अनेक देशासाठी दहशतवाद पोसणे किंवा त्याची निर्यात करणे हा त्यांच्या परराष्ट्र धोरणाचा भाग आहे, अशा देशांवरही कठोर कारवाई व्हायला हवी.. अशा देशांवरील कारवाई करताना संबंधित देशांबरोबरचे व्यापारी हितसंबंध आड येता कामा नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केल्याचे एएनआयच्या वृत्तात म्हटले.
जगभरातील वेगवेगळ्या कुख्यात दहशतवादी संघटनांना वेगवेगळ्या सरकारांकडूनच पैसा पुरवला जातो. असे देश दहशतवादाला फक्त आर्थिकच नाही तर राजकीय, शासकीय आणि वैचारिक समर्थनही देतात, असा आरोप त्यांनी पाकिस्तानचा थेट उल्लेख न करता केला. दहशतवाद्यांना आश्रय देणे हे दहशतवादाला प्रोत्साहन देण्यासारखेच असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संबोधनात पाकिस्तानचा स्पष्ट उल्लेख नसला तरी त्याचं संबोधन हे पाकिस्तानातून पोसल्या जाणाऱ्या आणि भारतात पाठवल्या जाणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांच्या कारवायांनाच उद्देशून असल्याचं स्पष्ट आहे. दहशतवादाला पाठिंबा देणाऱ्या किंवा आपल्या परराष्ट्र धोरणाचा भाग म्हणून दहशतवाद निर्यात करणाऱ्या देशांना आंतरराष्ट्रीय समुदायाने बहिष्कृत केले पाहिजे, असे आवाहनही त्यांनी केले. सतत विकसित होणारे तंत्रज्ञान आणि त्यामुळे आलेली वेगवान संपर्क क्रांती याचा वापर करुन दहशतवादी संघटना वेगवेगळ्या मार्गाने आर्थिक रसद मिळवत आहेत. अशी रसद मिळवणे, हे कोणत्याही देशाचा सक्रिय पाठिंबा असल्याशिवाय शक्य होत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. जगातील कोणत्याच देशाने कोणत्याच अर्थाने दहशतवादी संघटनांना थारा देता कामा नये, असे सांगून पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, दहशतवादाच्या समस्येचा समूळ नायनाट करायचा असेल तर व्यापक एकात्मिक आणि सर्वकालिक प्रयत्न करणं आवश्यक आहे. आपल्या देशातील नागरिकांची सुरक्षितता सांभाळायची असेल तर दहशतवाद आपल्या घरापर्यंत येऊस्तोवर त्याची वाट पाहता कामा नये. यासाठी अशा दहशतवादी संघटनांचा बिमोड करण्यासाठी त्यांना सर्व पातळ्यांवर मिळणारी आर्थिक आणि शासकीय मदत रोखायला हवी. आताच्या काळात आंतरराष्ट्रीय दहशतवादाने उग्र रुप धारण केलं आहे. दहशतवादाच्या भस्मासुरापासून कोणताच देश सुरक्षित नाही. तरीही अजूनही अनेक देश दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी पूर्ण प्रामाणिक प्रयत्न करत नाहीत. यामुळेच दहशतवादाची आर्थिक रसद तोडण्यासाठी होत असलेली परिषद भारतात, नवी दिल्लीत होणे हे उल्लेखनीय आहे कारण सबंध जगाने आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करण्याच्या खूप आधीपासून भारत दहशतवादाच्या समस्येने होरपळलेला आहे, हे पंतप्रधानांनी स्पष्ट केले. राजधानी नवी दिल्लीत आज उद्या असे दोन दिवस चालणाऱ्या या आंतरराष्ट्रीय परिषदेतील जगभरातील वेगवेगळ्या देश आणि संघटनांचे तब्बल साडेचारशे पेक्षा जास्त प्रतिनिधी सहभागी झाले आहेत.

## तुमच्या आजीने स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी काय म्हटले होते तेही वाचा : देवेंद्र फडणवीस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** भारताच्या माजी पंतप्रधान आणि तुमचा आजी इंदिरा गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी काय म्हटले होते तेही वाचा, असे म्हणत देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी राहुल गांधींवर पलटवार केला. काँग्रेस नेते राहुल गांधींनी सावरकरांनी इंग्रजांची माफी मागितल्याचे पत्र दाखवत त्या पत्राच्या ओळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनाही वाचण्यास सांगितले. यानंतर आता फडणवीसांना ट्वीट करत राहुल गांधींना प्रत्युत्तर दिले. यात देवेंद्र फडणवीसांनी माजी पंतप्रधान इंदिरा गांधींपासून राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्यापर्यंत अनेक नेत्यांचा उल्लेख करत "अरे भाई आखिर कहना क्या चाहते हो?" असा प्रश्न विचारला.
देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या ट्वीटमध्ये म्हटले, राहुल गांधींनी काल मला एका पत्राच्या शेवटच्या ओळी वाचण्यास सांगितले होते. आज मी त्यांना काही कागदपत्रे वाचून दाखवू इच्छितो. आपल्या सर्वांचे आदरणीय महात्मा गांधींचे हे पत्र तुम्ही वाचले का? या पत्रात तुम्ही मला वाचायला सांगितल्या तशाच शेवटच्या ओळी आहेत का? भारताच्या माजी पंतप्रधान आणि तुमचा आजी इंदिरा गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी काय म्हटले होते तेही वाचा. त्या वीर सावरकरांना स्वातंत्र्याच्या आंदोलनातील आधारस्तंभ आणि कायम लक्षात राहणारा भारताचा सुपुत्र म्हणत आहेत, असे मत देवेंद्र फडणवीसांनी व्यक्त केले. देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले, महाराष्ट्राच्या राजकारणात आपले विशेष स्थान निर्माण केलेल्या शरद पवारांनी सावरकरांविषयी काय म्हटले आहे हेही वाचा. याच पत्रात ते दोन जन्मठेपेच्या शिक्षांचा उल्लेख करतात. "काँग्रेसचे दिवंगत नेते आणि माजी पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव म्हणाले होते की, स्वातंत्र्यवीर सावरकर एक प्रखर राष्ट्रवादी होते. सामाजिक सुधारणांसाठी त्यांची कटिबद्धता, युवा पीढिला शिकवण देणारी त्यांची ऊर्जा अशा अनेक मुद्द्यांवर त्यांनी लिहिलं आहे. वाचा," असं म्हणत फडणवीसांना राहुल गांधींना वाचण्याचा सल्ला दिला.



## 'एसटी'च्या ताफ्यात येणार पाच हजार इलेक्ट्रिक, 2 हजार डिझेल बसगाड्या

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात भाडेतत्त्वावर पाच हजार इलेक्ट्रिक तसेच दोन हजार डिझेल बसगाड्या खरेदी करण्यात येणार आहेत. त्याशिवाय डिझेलवरील पाच हजार बसगाड्यांचे टप्प्या-टप्प्याने 'एलएनजी' मध्ये रुपांतर करण्यास आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील संचालक मंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. दरम्यान, महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटीचा चेहरामोहरा बदलणे आवश्यक असून स्वच्छता-टापटीपपणा ठेवून गाड्यांची निगा राखा आणि राज्यातील जनतेला दर्जेदार सेवा पुरविण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या संचालक मंडळाची ३०२ वी बैठक आज सह्याद्री अतिथीगृहात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन- नैनोटिया, महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चेन्ने, कामगार आयुक्त सुरेश जाधव, परिवहन आयुक्त विवेक भीमनवार यांचेसह एसटी महामंडळ, परिवहन विभागाचे वरिष्ठ अधिकारी बैठकीस उपस्थित होते. राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात ५ हजार १५० इलेक्ट्रिक बसेस भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत, यापूर्वीच्या बैठकीत मान्यता मिळालेल्या दोन हजार बसेस घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यामध्ये वाढ करून ५ हजार१५० इलेक्ट्रिक बसेस घेण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी यावेळी मान्यता दिली. इलेक्ट्रिक बसेस या वातानुकुलित असल्याने त्याचे सध्याच्या वातानुकूलित बसेस पेक्षा तिकिटदर कमी ठेवून प्रवास सुखकर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी दिल्या. सीएनजी बसेससाठी चेसिस उपलब्ध होत नसल्याने आणि सीएनजी पंपांची कमी संख्या पाहता सीएनजीऐवजी दोन हजार डिझेल बसगाड्या वाहने एसटीच्या ताफ्यात घेण्यास आणि पुणे व सांगली विभागाकरिता १८० बसगाड्या भाडेतत्वावर घेण्यासही मुख्यमंत्र्यांनी मान्यता दिली.

## देशातील पहिले खासगी रॉकेट 'विक्रम एस'चे यशस्वी उड्डाण


### 545 किलोग्रॅम विक्रम-एसचे वजन

आधुनिक केसरी न्यूज

नवी दिल्ली : देशाच्या अंतराळ विकास कार्यक्रमाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला असून पहिलं खासगी रॉकेट विक्रम एसचे आज यशस्वी उड्डाण करण्यात आले आहे. 'मिशन प्रारंभ' अंतर्गत विक्रम एस या हायपरसोनिक रॉकेटचं सकाळी 11.30 वाजता उड्डाण करण्यात आले. श्रीहरीकोटातील स्पेस स्टेशनवरून इस्त्रोच्या मदतीने हे उड्डाण करण्यात आले असून त्यामुळे देशात खासगी रॉकेट विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे इलॉन मस्कच्या स्पेसएक्सप्रमाणे भारतातही खासगी कंपन्यांकडून अंतराळ क्षेत्रात कामगिरी केली जाणार आहे. हैदराबादच्या स्कायरुट एरोस्पेस या खासगी कंपनीकडून विक्रम एस या रॉकेटचे लॉन्चिंग करण्यात आले असून त्याचा वेग आवाजाच्या पाच पटीने जास्त आहे. या लॉन्चिंगसाठी भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्था म्हणजे इस्त्रोची मदत झाली आहे. या मिशनला प्रारंभ असे नाव देण्यात आले आहे. या रॉकेटचे विक्रम हे नाव भारतीय अंतराळ संशोधनाचे जनक डॉ. विक्रम साराभाई यांच्या नावावरुन देण्यात आले आहे. स्पेस किड्झ इंडिया, बॅझूमक्यू आर्मेनिया आणि एन स्पेस टेक इंडिया या तीन पेलोड्सचे वहन विक्रम एस या रॉकेटमधून करण्यात आले आहे. विक्रम एसमध्ये रॉकेटची स्पिनिंग स्थिरता कायम रहावी यासाठी सॉलिड थ्रस्टर्स 3D-प्रिंटचा वापर करण्यात आला आहे. या रॉकेटच्या माध्यमातून भविष्यातील विक्रम सीरिजच्या ऑर्बिटल-क्लास अंतराळ प्रक्षेपण वाहनांसाठी 80 टक्के तंत्रज्ञानाची चाचणी घेण्यात येणार आहे. विक्रम-एस चे वजन 545 किलोग्रॅम असून त्याची लांबी सहा मीटर तर व्यास 0.375 मीटर आहे. यामध्ये सात टनांचा पीक व्हॅक्यूम थ्रस्टचा वापर करण्यात आला आहे. विक्रम एस हे 83 किलोग्रॅम वजनाचे पेलोड कमाल 100 किलोमीटर उंचीवर वाहून नेऊ शकते.



## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

## फिटे अंधाराचे जाळे



कोणतीही गोष्ट हातात धरता येत नव्हती. या सगळ्या साध्या साध्या गोष्टींपासून सुरुवात करून वल्लरीला शाळेत घेऊन जाणे, तिला शिकवणे, परीक्षा द्यायला लावणे आणि तिने एम ए संस्कृत प्रथमवर्गात उत्तीर्ण होण्यापर्यंत मजल मारणे या सगळ्या खऱ्या तर अशक्यप्राय वाटणाऱ्या गोष्टी. पण करमरकर कुटुंबीयांनी अथक प्रयत्नांनी त्या साध्य केल्या. मला त्यांना भगीरथाचे वंशज म्हणावेसे वाटते. भगीरथाने अथक प्रयत्न केले. स्वर्गातील गंगा पृथ्वीवर आणली. म्हणूनच कोणी  प्रयत्नांची पराकाष्ठा केली की आपण त्याला ' भगीरथ प्रयत्न ' केले असे म्हणतो. या अर्थाने करमरकर हे भगीरथाचे वंशज आहेत. ' फिटे अंधाराचे जाळे ' वाचताना आपला प्रवास वल्लरीबरोबर होत असतो. जसजशी तिची प्रगती होते, तसतसे आपणही त्याचे साक्षीदार होत जातो. हे पुस्तक भाऊंनी ( भालचंद्र करमरकर ) इतके सुंदर लिहिले आहे की वल्लरीची जीवनगाथा जणू जिवंत होऊन आपल्यापुढे उलगडते. ती तीनचाकी सायकल चालवायला शिकते, बुद्धिबळ शिकते तेव्हा तिच्या पालकांना होणारा आनंद आपल्यालाही होतो. ती वाचायला शिकते, शाळेत जाते, परीक्षा देते, लुनावर बसायला शिकते, संगणकावर लिहायला शिकते या सगळ्या प्रगतीच्या आनंदाचे साक्षीदार हे पुस्तक वाचताना आपण होत जातो. तिला परीक्षेसाठी रायटर मिळवताना भाऊंना करावी लागणारी कसरत त्यांच्या सहनशक्तीचेही परीक्षा घेणारी असते. पण त्यात जेव्हा ते यशस्वी होतात, तेव्हा त्यांच्याइतकाच आनंद आपल्याला होत जातो. आज वल्लरी स्वतः लिहू शकते, गाणे म्हणू शकते, कॅसिओ वाजवते. जवळपास सगळी मराठी, हिंदी गाणी, कविता तिला तोंडपाठ आहेत. गाणे आणि कवितांचा वल्लरी म्हणजे जणू एनसायक्लोपीडिया. सर्वच दृष्टीने ' फिटे अंधाराचे जाळे ' हे पुस्तक म्हणजे जणू एक लखलखते झुंबर आहे. त्यात प्रयत्नांचे सौंदर्य, परिश्रमांची गाथा, आणि जिद्दीचा प्रवास आहे. वल्लरीसारखी मुले इतरही पालकांना असतात. कितीतरी मुलांना जन्मजात **(क्रमशः)**



## आनंदी पहाट

### पती-पत्नीच्या नात्याची वीण घट्ट हवी

आधुनिक केसरी

अलीकडच्या काळांत पती-पत्नीच्या मतभेदाला, वादाला पत्नीच्या जवळच्या नातलगांना जबाबदार धरले जात असल्याचे दिसून येते. काही प्रमाणांत त्यांचा सहभाग गरजेपेक्षा, जरुरीपेक्षा अधिक असल्याचे देखील चित्र दिसून येते. ह्यांतही आर्थिक बाब प्रकर्षाने वादाचे निमित्त असल्याचे कळते. काहीवेळा मानसिक पातळींवर होणारे परिणाम इतके गंभीर असतात, कि संबंधित व्यक्ती जीव देण्या-घेण्याची कृती करण्यास प्रवृत्त होते, ते थांबलेच पाहिजे. अनेकदा स्वभावापेक्षा प्रभावाला महत्व अधिक दिले जाते. कालांतराने परस्परांमधील आभावांची जाणीव व्हायला लागते, दुरावा निर्माण होऊ लागतो. संवादाआभावी निर्माण होणाऱ्या गैरसमजुतीचे वादांत रुपांतर होऊ लागते. रोजच्या कामांतून थोडा वेळ काढून आपले रुटीन, काम आणि मुले असे मुद्दे वगळून एकमेकांशी संवाद साधला तर हे नाजूक संबंध मजबूत व्हायला मदत होऊ शकते. ह्यासाठी स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा असतो, हे समजून घेतले पाहिजे.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

विवाह करण्यामागचे खरे कारण न समजण्याची उणिव असेल तर असे विवाह दीर्घकाळ टिकत नाहीत अथवा टिकले तरीही व्यक्तिगतरीत्या ते असफल झाल्याचेच स्पष्ट होते. विवाहबंधन असा शब्दप्रयोग आपण सर्रास ऐकतो-करतो, तोच खरे तर चुकीचा असल्याची जाणीव करून घेणे आवश्यक असते. सर्व बंधने झुकारून वैवाहिक सुख, समाधान आणि शांती शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक, वैवाहिक, शैक्षणिक पातळींवर परस्परांना देण्यासाठी कटिबद्ध असणे जरुरीचे असते. ह्याठिकाणी स्वतः पेक्षा सहचारीणीचा विचार प्रकर्षाने, प्राधान्याने आणि प्रामुख्याने करणे अभिप्रेत असते. ह्या दृष्टीकोनातून स्वार्थ नाही तर परमार्थ महत्वाचा ठरत असतो.



आधुनिक केसरी

### सत्कर्माचे सार | परमानंद ||

मनोभावे कर्म | करी जो निष्काम ||
फळ तया ठाम | प्राप्त होई ||१||
श्रध्देचिया पोटी | यशाचे गमक ||
जाणी जो शोधक | धन्य होई ||२||
कष्टावीन थारा | नसे यशा द्वारी ||
आयतोबा घरी | सर्वनाश ||३||
किमान गरजा | देती समाधान ||
सुखाचे कारण | जाण जीवा ||४||
सात्विक मनात | नांदतो ईश्वर ||
सत्कर्माचे सार | परमानंद ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## “निरुपण”

आधुनिक केसरी

### भक्ती

स्वर मुखी आम्हा नाही।
शब्द वेडे बोले काही।
सुख वेडेपणे काही।
जाणत शहाणे नाही।
माय आम्हा वेडे ठेवी।
तव भक्ती परि देई।
चंद्रहास म्हणे माई।
गोड नाम मुखी देई।।



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ||कर्तव्य करावे, मग व्हायचे ते होऊ द्यावे ||



आधुनिक केसरी

जगामध्ये आणि जीवनामध्ये दुःख आहे यात शंका नाही. पण त्यापैकी पंचवीस टक्के दुःखच बाहेरून येते. युद्ध, महागाई, दुष्काळ, चोऱ्यामाऱ्या, दारिद्र्य इत्यादिंचे दुःख बाहेरून येते. पण पंचाहत्तर टक्के आपले दुःख आपल्यामधूनच निर्माण होत असते. आपले शरीर, मन आणि हृदयस्थ भगवंत मिळून आपण बनतो. भगवंत आनंदरूप असल्याने तो दुःख निर्माण करू शकणार नाही. देहाचा स्वभाव झिजणे, क्षीण होणे, असमर्थ होत जाणे, हा असल्याने तो आपल्या मार्गाने जात असतो. तो दुःख निर्माण करू शकत नाही. जे जडच आहे ते सुखही देऊ शकत नाही आणि दुःखही निर्माण करू शकत नाही. उरले आपले मन. कुठेतरी चिकटणे हा मनाचा स्वभावधर्म असल्याने ज्याला ते चिकटते त्याचे गुणधर्म अंगिकारते. भक्ताचे मन भगवंताला चिकटते म्हणून त्याच्या मनातून दुःख निर्माण होऊच शकत नाही. ज्याचे मन देहाला चिकटते, त्याचे मन दुःख निर्माण करीत असले पाहिजे. भगवंताहून वेगळेपण आणि देहाशी एकपण, या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. देह लहान आहे, आकुंचित आहे, तात्पुरता आहे, सान्त आहे, तोच मी आहे अशा घट्ट भावनेने जिकडेतिकडे दोनपण दिसू लागते आणि त्यातून भयरूपी समंध साकार होतो आणि तो जीवाला छळतो. भगवंताच्या स्मरणात आनंदाची मस्ती भोगायला जन्मलेला माणूस, भयापोटी चिंता आणि चिंतेपायी दुःख निर्माण करतो. भगवंताने आपल्या संकल्पाने जग निर्मिले. त्यात घडणाऱ्या घटनांचा आराखडा त्या संकल्पात असतो. कालचक्र जसे फिरते तशा घटना आकार घेत जातात. त्यात भगवंताचा हात असतो. त्याचा विसर पडला की आपण गोंधळून जातो, आणि आपली कल्पना भय निर्माण करते. भगवंत मला सांभाळणारा आहे ही वस्तुस्थिती आहे, कारण भगवंताने स्वतःतूनच हे जग निर्माण केले. आपण अंतर्यामी त्याच्या नामात गुंतून राहिलो, तर त्याचे साहाय्य कसे मिळते याचा अनुभव आपोआप येईल. भगवंत नामस्वरूप आहे, म्हणून त्याच्या नामात राहाणाऱ्याला देहाचे काय होईल याचे भय उरत नाही. आपल्या प्रयत्नाने जेवढ्या गोष्टी करता येतील तेवढ्या करा. त्या होतच असतात, प्रयत्नाने फक्त आपला हात लागतो. आपल्या मनासारखे व्हावे असे म्हणणे म्हणजे ज्या होणाऱ्या गोष्टी आहेत त्या मी बदलाव्या, असे म्हणण्यासारखे आहे. त्या कधी बदलल्या जात नाहीत, आणि आपल्याला आनंद कधी मिळत नाही. म्हणून म्हणतो, रामावर निष्ठा ठेवावी. माझे कर्तव्य मी केले आहे ना ? ते करीत असताना मी अनीति, अधर्माने वागलो नाही ना ? आता जे व्हायचे ते होऊ दे; कुठे काळजी करा ! ही वृत्ती ठेवून जगात जो वागेल ना, तोच मनुष्य सुखी होईल.

३१३. देहाचा लगाम भगवंताच्या हातात द्यावा आणि नामस्मरणात मजेत दिवस घालवावे.श्रीराम समर्थ

## मनाचे श्लोक



आधुनिक केसरी

**विधीकारणे जाहला मछ वेगीं।**
**धरी कुर्मरूपे धरा पुष्टिभागी।**
**जना रक्षणाकारणे नीच योनी।**
**नुपेक्षी कदा देव भक्ताभिमानी।।१२०।।**

**अर्थ :-**

देवाने ब्रम्हदेवासाठी मत्स्याचे रूप घेतले. पृथ्वी समुद्रा तळी जाऊ नये म्हणून ते कासव अर्थात कुर्म झाले. वेळ पडली तेव्हा अखिल जगताच्या रक्षणासाठी वराह योनीत ही जन्म घेतला, पण भक्ताची लाज राखण्याचे आपले ब्रीद टिकविले.

**भावार्थ :-**

जलप्रलय येण्यापूर्वी श्री विष्णूनी मत्स्य हा पहिला अवतार घेतला होता. तो ब्रम्हदेवाचे हरवलेले वेद परत मिळवून देण्यासाठी आणि पृथ्वीवरील सर्व जीवांना नवे जीवन दान देण्यासाठी घेतला होता. जलप्रलय होण्याच्या आधी त्यावेळचा राजा सत्यव्रत नदीत स्नान करून सूर्याला अर्घ्य देण्यासाठी कमंडलूत पाणी घेत होता तेव्हा त्यात एक छोटीशी मासोळी आली. राजा तिला परत प्रवाहात सोडायला लागला तर ती म्हणाली, नको, मला परत प्रवाहात सोडू नको. इतर मोठे मासे मला खातील.” तेव्हा राजाने तिला कमंडलूतच राहू दिले. पण लवकरच ती मासोळी इतकी मोठी झाली की कमंडलूत ती मावेना. तेव्हा राजाने तिला आपल्या उद्यानातील सरोवरात सोडले पण तिथेही तिचा आकार महाकाय माशाएव्हढा झाला. त्याच्या डोक्यावर एक मोठे शिंगहि होते. झाला. राजाला आश्चर्य वाटले. हा काही  साधारण मासा नाही हे त्याने ओळखले आणि वंदन करून माशाला खऱ्या रुपात प्रकट व्हायला सांगितले. तत्क्षणी माश्यातून श्री विष्णू प्रगट झाले आणि त्यांनी राजाला आज्ञा केली की त्यांनी आपल्याला आता समुद्रात सोडावे. थोड्याच दिवसात जलप्रलय होणार आहे तेव्हा एक प्रचंड नौका तयार करून पृथ्वीवरील सर्व वनस्पती आणि प्राण्यांच्या जोड्यांना त्या नावेत रहायला सांगावे. प्रलय येईल तेव्हा वासुकी नागाचा दोर करून त्याच्या सहाय्याने त्या नावेला आपल्या डोक्यावर उगवलेल्या शिंगाला बांधावे म्हणजे तो मासा नावेला सुरक्षित जागी घेऊन जाईल आणि सर्वांचे रक्षण करील. सत्यव्रत मनूने त्या आज्ञेचे पालन केले. सात दिवसांनंतर खरोखरच प्रलय झाला. आणि मत्स्यअवतारातील भगवान विष्णूंनी नौका हृष्यशृंग पर्वतावर नेऊन ठेवली. दरम्यानच्या काळात हयग्रीव नावाच्या राक्षसाने ब्रम्हदेवाच्या (विधीच्या) हातातून वेद पळवून नेले  होते तेहि त्यांनी हयग्रीवाचा वध करून परत मिळवून ब्रम्हाला दिले. त्या वेदांमधील ज्ञानाच्या योगाने आणि प्रत्येक वंशातील जोडप्यांच्या सहकार्यातून ब्रम्हा आणि मनुने पुराचे पाणी ओसरल्यानंतर नवीन सृष्टी निर्माण केली. अशा रीतीने मत्स्य अवतार घेऊन देवाने सृष्टीचा उद्धार केला. तिची उपेक्षा केला नाही.

दुसरा अवतार त्यांनी कूर्म म्हणजे कासवाचा घेतला आणि पृथ्वीला समुद्रात बुडण्यापासून वाचवले.  असे म्हणतात की एकदा इंद्राचा खजिना रिकामा झाला, विश्वाचा कारभार चालवणे कठीण होऊन बसले. तेव्हा तो भगवान श्रीविष्णूकडे गेला. भगवंताने त्याला समुद्रमंथन करून जडजवाहीर मिळवण्याचा मार्ग सुचवला. इंद्राने मिळेल त्या धनातला वाटा देण्याचे कबूल करून असुरांनाहि मदतीला बोलावले. आता समस्या होती इतका मोठा, अथांग सागर घुसळून काढायचा तर तशीच मोठी मथनी, किंवा रवी लागणार होती. अशा वेळी मेरू पर्वताची मनधरणी करून त्याला आणि रवीला दोरी हवी म्हणून वासुकीला या कामासाठी राजी करण्यात आले. एका बाजूने सुर म्हणजे देव आणि दुसऱ्या बाजूने असुर, म्हणजे दानव अशा तऱ्हेना मंथनाला सुरुवात झाली. परंतु अथांग समुद्रात मेरू पर्वत बुडायला लागला. त्याला खालून काहीच आधार मिळेना. सर्वांनी मग विष्णूची करुणा भाकली. तेव्हा श्री भगवान विष्णू मदतीला धाऊन आले. त्यांनी कासवाचा म्हणजे कूर्म अवतार धारण केला आणि समुद्रात बुडी घेऊन मेरू पर्वताला आपल्या पाठीवर तोलून धरले.

दास चैतन्य
संपर्क क्र. ८३८००१९६७६

# तंत्रज्ञानासोबत कला आणि संस्कृती शिक्षणातून विद्यार्थी व्यक्तिमत्व बहरते : शशिकांत कुलथे

## स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमाला : शिक्षकांनी मनापासून ठरवले तर ते काहीही करू शकतात : अजित पवार






आधुनिक केसरी न्यूज

**बीड : शिक्षक व विद्यार्थ्यांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्यरित्या वापर केला पाहिजे. तंत्रज्ञानासोबत कला आणि संस्कृती शिक्षणातून विद्यार्थी व्यक्तिमत्व बहरते, असे प्रतिपादन राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांनी केले. दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे चौथे पुष्प शुक्रवारी बीड येथील विनायक कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शशिकांत कुलथे यांनी गुंफले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजित पवार, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजू मचाले, विनायक कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रशांत पवळ, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी, मुख्याध्यापिका श्रीमती कीर्तीताई पांगारकर, रामेश्वर बांगड यांची विशेष उपस्थिती होती.**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे मराठवाडा अध्यक्ष वैभव स्वामी, दैनिक मराठवाडा साथीचे जिल्हा प्रतिनिधी संदीप बेदरे, डॉ. प्रभू गोरे, स्वप्नील चोभारकर आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोमनाथ सरमल यांनी केले. प्राचीन काळापासूनच भारतीय संस्कृती ही जगामध्ये सर्वश्रेष्ठ म्हणून ओळखली जाते. प्राचीन भारतीय शिक्षणाची लक्ष हे पूर्ण आत्मज्ञान आणि शालेय शिक्षणात नंतर जीवनाची तयारी यावर आधारित होते. प्राचीन काळात भारतामध्ये तक्षशिला, नालंदा, विक्रमशीला, वल्लभि या प्राचीन विश्वस्तरीय संस्थेद्वारे अध्ययनाच्या विविध क्षेत्रात शिक्षण केवळ देशातीलच नव्हे तर परदेशातील विद्यार्थ्यांनाही उत्तम प्रकारे उपलब्ध करून दिले गेले होते. अशा या प्रभावी शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या भारतामध्ये चरक, सुश्रुत, आर्यभट्ट, वराहमीहीर, भास्कराचार्य, चाणक्य, चक्रपाणि दत्ता, माधव, पाणिनी, पतंजली, नागार्जुन, गौतम, पिंगला, शंकरदेव, मैत्रयी, गार्गी, थीरुवल्लुवर या महान विद्वानांचा जन्म झाला. या विद्वानांनी वैश्विक स्तरावर प्राप्त ज्ञानाच्या माध्यमातून गणित, खगोल, विज्ञान, धातुशास्त्र, चिकित्सा, शल्यचिकित्सा, सिव्हिल इंजिनियर, गृहनिर्माण, नौकानयन, दिशा, योगशास्त्र, ललित कला, अशा ज्ञानाच्या विविध क्षेत्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यामुळेच भारतीय संस्कृती आणि भारतीय शिक्षण प्राचीन काळापासूनच आपले वेगळेपण निर्माण करत कार्यरत आहे. याच भारतीय प्राचीन संस्कृती आणि शिक्षणाचा हेतू साध्य करण्यासाठी भारताची महामही पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२२ रोजी दिल्ली येथील लाल किल्ल्यावरून देशाला संबोधित करताना आगामी काळातील २५ वर्ष ही पंचप्रण यावर केंद्रित केलेले आहेत. हे पंचप्रण म्हणजे विकसित भारत, गुलामीच्या विचारातून मुक्ती, सांस्कृतिक संपदेवर गर्व, एकता व एकात्मता, नागरिकांद्वारे कर्तव्य पालन. भारतामध्ये विविध शैक्षणिक धोरण तयार करण्यात आलेले आहेत. सन १९८६ नंतर प्रथमच राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार करण्यात आलेले आहे. एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण म्हणून या धोरणाची ओळख आहे. या आयोगानुसार साक्षरता आणि संख्याज्ञान या पायाभूत क्षमतांसोबतच उच्चस्तरीय तारिक आणि समस्या समाधान संबंधी संख्याज्ञान क्षमता विकास यावर भर देण्यात आलेला आहे.

**राष्ट्रीय शिक्षण आयोग २०२० मूलभूत सिद्धांत**

१. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या क्षमतांची स्वीकृती, ओळख आणि विकासासाठी प्रयत्न. २. पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान याला प्राधान्य. ३.अध्ययन-अध्यापन लवचिकता ४. प्रत्येक विषयामध्ये परस्पर संबंध ५. बहुविषयक व समग्र शिक्षण विकास ६. संकल्पना स्पष्टीकरणावर भर ७. रचनात्मक आणि तार्किक विचार ८. नैतिकता मानवी आणि संवैधानिक मूल्य विकास. ९. बहुभाषिकता प्रयोग व प्रोत्साहन. १०. जीवन कौशल्य विकास. ११. सतत मूल्यांकन भर. १२. विविधता व स्थानीय परिस्थितीनुरूप शिक्षण.

१३. सर्व शैक्षणिक निर्णयात समता व सर्वसमावेशकता. १४. शालेय शिक्षण ते उच्च शिक्षण पाठ्यक्रमात परस्पर संबंध. १५. शिक्षक प्रशिक्षण केंद्रस्थानी. १६. गुणवत्तापूर्वक शिक्षणासाठी उत्कृष्ट स्तरांचा शोध. १७. निरंतर संशोधन, नियमित मूल्यमापन याद्वारे प्रगतीचे सतत समीक्षण. १८. भारतीय संस्कृती आणि गौरव यांचा सन्मान. १९. शिक्षण एक सार्वजनिक सेवा. २०. एक मजबूत जिवंत सार्वजनिक शिक्षण प्रणाली मध्ये पर्याप्त गुंतवणूक.

**राष्ट्रीय शिक्षण आयोग २०२० ध्येय**

विद्यार्थ्यांमध्ये भारतीय होण्याचा गर्व केवळ विचारातच निर्माण करणे नव्हे तर व्यवहार, बुद्धी, कार्यामध्ये तसेच ज्ञान, कौशल्य, मूल्य आणि विचार याद्वारे प्रत्येक विद्यार्थी वैश्विक नागरिक निर्माण होईल. अशा या शैक्षणिक धोरणाला अनुसरून शालेय स्तरावर अध्ययन अध्यापन करत असताना ते प्रभावी होण्यासाठी विविध संसाधने उपयोगात आणणे गरजेचे असते. ही संसाधने प्रभावी असतील तर त्याद्वारे होणारे अध्ययन अध्यापन हे निश्चितच प्रभावी होण्यास मदत होते. अशा या अध्ययन-अध्यापनातील प्रभावी संसाधने कोणती? त्यांचा उपयोग कसा आणि केव्हा करावा? यावर्षी आपण माहिती पाहूया..

**१. कला समावेशित शिक्षण :** भारतीय संस्कृतीमध्ये १४ या आणि ६४ कला यांचा उल्लेख आढळतो. यामधील ६४ कलापैकी आपणास युक्त असणाऱ्या विविध कलांचा उपयोग आपण आपल्या शालेय जीवनात दैनंदिन अध्ययन अध्यापनात करू शकतो. ज्याद्वारे आपले अध्ययन अध्यापन प्रभावी होण्यास नक्कीच मदत होते.

**संगीत :** संगीतही सर्वश्रेष्ठ ललित कला म्हणून ओळखली जाते. कारण संगीताला समजण्यासाठी कुठल्याही भाषेची आवश्यकता लागत नाही. प्राचीन काळापासूनच हे संगीत अस्तित्वात असून त्याचे अनेक दाखले व पुरावे आपणास पहावयास मिळतात. अनादी काळापासूनच या संगीताचा उपयोग होत असल्याचे अनेक पुरावे आपल्याकडे उपलब्ध आहेत. भगवान कृष्ण आणि बासरी, भगवान शिव शंकर आणि डमरू तसेच तांडव नृत्य, सरस्वती आणि विणा,या सर्वांमधून संगीताचे अस्तित्व आपणास जाणवते. आपल्या सभोवताली असणाऱ्या निसर्गातूनच संगीतातील सप्त स्वरांची निर्मिती झालेली आहे. संगीताबद्दल वर्णन करताना म्हटले जाते.

***संगीत हे शक्ती ईश्वर की हर स्वर मे बसे हैं राम रागी जो सूनाये रागिनीरोगी को मिले आराम..***

आजच्या काळात विविध रोगांवर उपचार म्हणूनही संगीत उपचार पद्धतीचा उपयोग केला जातो. ज्यायोगे अनेक असाध्य रोगांचा उपचार करण्यात येत आहे. संगीतातील स्वरामधून नवरस निर्मिती व त्यांचे प्रकटीकरण सहजासहजी अत्यंत प्रभावीपणे करता येते. अशा या संगीताचा शालेय दैनंदिन अध्ययन अध्यापनात प्रभावी वापर करण्यासाठी प्रामुख्याने त्या संगीतातील स्वरांची ओळख, वाद्य आणि त्या वाद्यांचा परिचय, विविध प्रकारची स्फूर्ती गीते, प्रार्थना देशभक्तीपर व समूह गीतांची ओळख व गायन, मराठी हिंदी इंग्रजी कवितांना स्वरबद्ध करून त्यांचे सादरीकरण, विविध संगीत व्हिडिओंची निर्मिती, विविध गीतांचे सादरीकरण, कवितांवर व गीतांवर आधारित नृत्य, नृत्य नाट्याद्वारे सादरीकरण, नाट्यछटांचा सुयोग्य उपयोग, संवादांचे नाट्यीकरण विविध घटकांच्या माध्यमातून संगीताचा वापर केल्यास अध्ययन अध्यापन प्रभावी व आनंददायी होण्यास मदत होते.

**२. कार्यानुभव :** या अंतर्गत विविध हस्तकलांचा उपयोग, भीती चित्रे आणि भीती फलक याच्या माध्यमातून विविध पाठ्य घटकांचे सादरीकरण, कागदकाम, मातकाम, कोलाज यांच्या माध्यमातून विविध विषया अंतर्गत उपयुक्त अशा साहित्याची निर्मिती करत नवनिर्मितीचा आनंद विद्यार्थ्यांना देता येतो. याबरोबरच परिसर भेट, क्षेत्रभेट याच्या माध्यमातूनही परिसराची प्रात्यक्षिक रूपात ओळख विद्यार्थ्यांना देता येते.

**३. क्रीडा :** शालेय जीवनात खेळास अनन्य साधारण महत्त्व आहे. क्रीडा पद्धतीतून अनेक प्रकारच्या विषयांचे अध्ययन अध्यापन वर्गात आणि वर्गाच्या बाहेरही मैदानावर वैयक्तिक आणि सांघिक पद्धतीने आपल्याला करता येते. यामध्ये विविध प्रकारच्या कवायत, वैयक्तिक व सामूहिक खेळ, विविध विषयाच्या समन्वयातून आधारित असणारे खेळांचा वापर करून खेळाच्या माध्यमातूनही विद्यार्थ्यांना शिक्षण देता येते.

**४. स्थानिक इतिहासाची ओळख :** राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इतिहासासोबतच विद्यार्थ्यांना ते ज्या परिसरात राहतात त्या परिसरातील इतिहासाची माहिती विद्यार्थ्यांना करून देणे आवश्यक आहे. माझ्या परिसराचा इतिहास आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय इतिहासाशी त्याचा असणारा सहसंबंध याच्या माध्यमातून इतिहासाची ओळख करून देता येते

**५. ज्ञानरचनावाद :** विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन करून शिकण्याची सवय अंगी बनवण्यासाठी ज्ञानरचनावाद उपयुक्त आहे. विविध शैक्षणिक साधनांची निर्मिती, वर्गामध्ये फरशीवर रंगाच्या माध्यमातून तयार केलेली साधने, बरोबर लो बजेट शैक्षणिक साधनांची निर्मिती करून विद्यार्थी केंद्री साधनातून ज्ञानरचनावादाचे प्रभावी अध्यापन करता येते.

**६.ऑगमेन्टेड फोर डी प्लस फ्लॅश कार्ड –**
या प्रकारच्या कार्डच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संकल्पना प्रत्यक्ष स्वरूपात अनुभवयास देण्यात येतात. यामध्ये ॲनिमल फोर डी, डायनासोर फोर डी, स्पेस फोर डी, ऑक्युपेशन्स फोर डी, आपली पृथ्वी रचना, आपले शरीर रचना, आपली सूर्यमाला, ग्रह व तारे, वनस्पती अवयव रचना, प्राणी अवयव रचना, मर्ज क्यूब, ज्वालामुखी, वनस्पतीची वाढ, सागरतळ रचना,यासह ३६ हून अधिक अनेक संकल्पना विद्यार्थ्यांना स्वानुभवातून शिकण्यास मिळतात.

**७.प्लीकर्स कार्ड्सद्वारे मूल्यमापन :**विविध पाठ्यघटकावर आधारित विद्यार्थ्यांचे अल्प श्रम, अल्प वेळ, अल्प खर्चामध्ये तात्काळ मूल्यमापन प्लीकर्स कार्डद्वारे करण्यात येते. यामुळे विद्यार्थी निहाय, वस्तुनिष्ठ, कॉपीमुक्त व आनंददायी वातावरणात मूल्यमापन होण्यास मदत होते. तसेच विद्यार्थ्यांच्या चुकांची प्रत्येक विद्यार्थिनिहाय दुरुस्ती करता येते.

**८. स्वयम् व शाळा ब्लॉग निर्मिती :** शाळेतील आयोजित विविध उपक्रम, विद्यार्थी प्रतिसाद, विद्यार्थी कला संवर्धन, यांची माझी जिल्हा परिषद शाळा या स्वयम् निर्मित ब्लॉग वर प्रसिद्ध करण्यात येत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये अनेक कलागुणांचा विकास होण्यास मदत होत आहे.

**९.यूट्यूब चैनल निर्मिती व उपयोग**
शशिकांत कुलथे यांनी स्वतःचे यूट्यूब चैनल निर्मित केले असून या चैनलवर विविध वर्गनिहाय, विषयनिहाय विविध पाठ्यघटकांवर आधारित ॲनिमेटेड व्हिडिओ स्वतः तयार करून आपल्या यूट्यूब चैनलवर अपलोड केलेले आहेत. या सर्व व्हिडिओचे क्यू आर कोड तयार करून त्यांचा उपयोग विद्यार्थीही शाळेसोबतच घरीही मोबाईलचा वापर करीत आहेत.

**१०. क्यूआर कोड व स्मार्ट पीडीएफची निर्मिती**
पाठ्यघटकावर आधारित स्वनिर्मित व्हिडिओ आणि विविध चाचणी परीक्षा प्रत्येक विद्यार्थ्यांना आपल्या वेळेनुसार, आवडीनुसार शाळेत तसेच शाळेच्या व्यतिरिक्त पूर्ण करता येण्यासाठी क्यूआर कोड आणि स्मार्ट पीडीएफची निर्मिती करून त्याचा वापर केला जात आहे.

**११. स्लाईड प्रोजेक्टरचा प्रभावी वापर :** भारतीय सांस्कृतिक संपदेतील विविध कला, लोककला, लोकनृत्य, शास्त्रीय नृत्य, विविध वास्तु, गड, किल्ले, विश्व सांस्कृतिक संपदा, यांची सचित्र माहिती विविध स्लाइड व प्रोजेक्टरच्या माध्यमातून देण्यात येते.

**१२. मर्ज क्यूब :** मर्ज क्यूब याच्या माध्यमातून आपण विद्यार्थ्यांना व्हर्च्युअली मानवी शरीर रचना, आपली सूर्यमाला, प्राणी शरीर रचना, पक्षी शरीर रचना, पेशीरचना, सागर तळ रचना, ज्वालामुखी, पर्वत रचना, बेडूक जीवनक्रम, पृथ्वीचे अंतरंग, यासह पाठ्यक्रमावर आधारित ३६ हून अधिक पाठ्यघटकांचे प्रभावी सादरीकरण करता येते.

**१३. पाठ्य घटकावर आधारित व्हिडिओ**
पाठ्यक्रमातील विविध प्रकारचे घटक, कविता, नाट्यछटा यावर आधारित विविध प्रकारचे व्हिडिओ निर्माण करण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे सॉफ्टवेअर्स किंवा मोबाईल ॲप्स यांचा वापर करून आपण प्रभावी व्हिडिओंची निर्मिती करू शकतो. यामध्ये पावर प्रेझेंटेशन, काईन मास्टर, सिनेमा एफ वी फाईव लाईट, ड्यू रेकॉर्डरस, यासह विविध ॲप्स चा वापर करून व्हिडिओ निर्मिती करता येते.

**१४. युट्युब चॅनल निर्मिती :** आपण स्वतः विविध सॉफ्टवेअर आणि मोबाईल ॲप्स चा वापर करून तयार केलेले व्हिडिओ हे युट्युब चॅनेल याचा वापर करून आपण इतरांसाठीही त्याचा उपयोग करून देऊ शकतो. युट्युब वर आपले स्वतःचे चॅनेल तयार करून यावरती पाठ्यक्रमातील विविध पाठ्य घटक, कविता यांचे व्हिडिओ अपलोड केल्यास शाळेच्या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना ते पाहता व उपयोगात आणता येतात याचबरोबर विविध ठिकाणच्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना देखील त्याचा वापर करण्यास मदत होते.

**१५. शाळेचा ब्लॉग निर्मिती :** शाळेचा किंवा स्वतःचा ब्लॉग निर्माण करून यावर आपण आपल्या शाळेत राबवत असलेल्या विविध शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांची माहिती प्रसिद्ध करू शकतो. ज्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची माहिती या ब्लॉगवर प्रसिद्ध होऊन विद्यार्थी देखील यामुळे प्रोत्साहित होऊन अधिक चांगल्या प्रकारे सादरीकरण करू शकतात

**१६. विविध आयसीटी साधने :**एकविसावे शतक हे तंत्रज्ञानाचे शतक म्हणून ओळखले जाते. अशा या तंत्रज्ञानाच्या युगात नवनवीन आयसीटी साधने आपल्याकडे उपलब्ध झालेले आहेत.मोबाईल च्या माध्यमातून विविध ॲप्स चा वापर आपणास करता येतो. याबरोबरच झूम, स्कायपी, फेसबुक व्हाट्सअप गुगल मीट याच्या माध्यमातून राज्य राष्ट्रीय स्तरावरील विविध ठिकाणांची ओळख, विविध लोकांची माहिती घेता येते. याबरोबरच कॉम्प्युटर, स्मार्ट टीव्ही, एलसीडी प्रोजेक्टर, स्मार्ट बोर्ड, स्लाईड प्रोजेक्टर, डिजिटल पाठ्यक्रम याचाही उपयोग आपणास करता येतो.

**१७. विविध क्लबची निर्मिती :** युनेस्को आंतरराष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून शाळा स्तरावर युनेस्को क्लबची स्थापना करून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित होणाऱ्या उपक्रमात व कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांना सहभाग घेता येतो. विज्ञान क्लब यासाठी विपनेट नवी दिल्ली द्वारा मान्यताप्राप्त क्लबची स्थापना करून वैज्ञानिक क्षेत्रातील विविध घटकांची ओळख या क्लबच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देता येते. त्याबरोबरच या संस्थेच्या माध्यमातून विविध प्रकारचे शैक्षणिक व वैज्ञानिक साहित्यही आपणास प्राप्त होते. नवी दिल्ली येथील सांस्कृतिक स्त्रोत आणि प्रशिक्षण केंद्र यांची मान्यता असणारे सीसीआरटी क्लब याद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजनही आपल्याला शाळा स्तरावर करता येते. याबरोबरच क्रीडा क्लब, पुस्तक वाचन क्लब, इको क्लब, संगीत क्लब, शालेय मंत्रिमंडळ, कला व सांस्कृतिक क्लब, दत्तक मित्र क्लब अशा विविध क्लबच्या माध्यमातून अध्ययन अध्यापन प्रभावी करता येते.

**१८. विविध ॲप्स चा वापर :** आजच्या युगात मोबाईलवर उपयोगात येण्यासाठी अनेक प्रकारचे ॲप्स उपलब्ध आहेत. यामध्ये पाठ्यक्रमावर आधारित असणारा दीक्षा ॲप, टॉकिंग बुक्स, रीड लॉन्ग ॲप्स, स्टोरी व्हिव्हर ॲप, रीड टू मी स्टुडन्ट ॲप, व्ही स्कूल ॲप, पाठ्यक्रमावर आधारित ऑडिओ बुक्स, अत्यंत प्रभावीपणे आपणास वापरता येतात.

**१९. प्लिकर्स कार्ड :** अध्ययन अध्यापन करत असताना ते कितपत प्रभावी झालेले आहे. यासाठी मूल्यमापन आवश्यक असते. हे मूल्यमापन अल्प वेळ, कमी श्रम यामध्ये करण्यासाठी प्लिकर्स कार्डचा उपयोग अत्यंत उपयुक्त ठरतो. याच्या माध्यमातून आपण प्रत्येक प्रश्न निहाय, विद्यार्थिनीहाय विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आपणास पाहता येतो व त्याचे अचूक मूल्यमापन तात्काळ करता येते.

**२०. चाचणी व परीक्षा**
गुगल फॉर्म, टेस्टीमोज यासारख्या विविध ॲप्स च्या माध्यमातून पाठ्यक्रमावर आधारित विविध चाचणी व परीक्षा यांची निर्मिती करून आपण आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या वेळेनुसार वर्गामध्ये आणि विद्यार्थ्यांचा घरीही ही चाचणी मोबाईलवर विद्यार्थ्यांना सोडविण्यासाठी देऊ शकतो. यामुळे प्रत्येक विद्यार्थ्यांचा प्रतिसाद आपल्याला मोबाईलच्या माध्यमातून एकत्रित करता येतो. याबरोबरच डिजिटल चार्ट, सीसीआरटी स्लाइड्स व चित्रे, भीती चित्रे व भीत्तीफलक, हस्तलिखिते, इंग्रजी भाषा समृद्धी विकसनासाठी लीफ फॉरवर्ड उपक्रमांचे आयोजन, आकाशवाणी द्वारे विविध कार्यक्रमात सहभाग अशा विविध पद्धतींचा वापर करून आपण आपल्या शाळा स्तरावर आपले दैनंदिन अध्ययन अध्यापन प्रभावी करू शकतो. अध्ययन अध्यापन प्रभावी करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अनेकविध पद्धती आपल्याकडे उपलब्ध आहेत. आपल्या शाळेच्या स्तरानुसार, स्थानिक परिस्थितीनुसार, आपल्या अंगी असणाऱ्या विविध कलागुणानुसार या सर्व पद्धतींचा वापर करून आपण आपले दैनंदिन अध्यापन प्रभावी करू शकतो. पण यासाठी आवश्यक असते ती काम करण्याची आवड, कल्पकता आणि विद्यार्थ्यांच्या विकासासाठी आवश्यक असणारा ध्यास. पद्धती किंवा संसाधने ही कोणतीही असली तरी त्याचा प्रभावीपणे उपयोग करणे हे प्रत्येक शिक्षकाच्या हातात असते. प्रत्येक शिक्षकाने आपल्यातील गुण आणि आपल्या अंगी असणारी क्षमता याचा विकास करून त्याचा उपयोग केल्यास होणारे अध्ययन अध्यापन हे नक्कीच प्रभावी आणि वैशिष्ट्यपूर्ण होऊ शकते यात शंका ती काय..!

1995 च्या नंतर शैक्षणिक क्षेत्रात खूप परिवर्तन आले व कोरोनाने तर सर्व शैक्षणिक पध्दत बदलली व सर्व शिक्षक गोंधळातच पडले तसेच पालकही गोंधळले, कारण नवीन टेक्नोलॉजी जुन्या शिक्षकांना एकदम आत्मसात करणे अवघड होते . आता याच पध्दतीने शिकवावे लागणार म्हणून जुने शिक्षक अधिक गोंधळले पण शेवटी शिक्षक हा सर्वांचा गुरु आहे . शिक्षकांनी मनापासून ठरवले तर ते काहीही करू शकतो, असा आशावाद या कार्यक्रमाचे अध्यक्ष बीड जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी अजित पवार यांनी अध्यक्ष समारोपात केला . पवार पुढे म्हणाले की, हे आमच्या शिक्षकाने दाखवून दिले . आज एका तांड्यावरील शिक्षकाला शिक्षण पध्दतीत केलेल्या नवनवीन प्रयोगामूळे राष्ट्रपती पदक देवून गौरविले याचा मला सार्थ अभिमान आहे . मी सुद्धा एका जिल्हा परिषदेच्या शाळेतून शिकून शहरातील कॉनवेंटमधील मुलांना मात देवून आयएएस झालो आहे . त्यामूळे मोठ्या शाळेपेक्षा मुले घडविण्यात शिक्षक महत्वाचा असतो, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजीत पवार यांनी सांगीतले .

# मस्क यांचा अल्टिमेटम

आधुनिक केसरी

ट्विटरचे नवे मालक एलॉन मस्क यांनी बहुतेक कर्मचाऱ्यांना कामावरून काढल्यानंतर ट्विटरचे अनेक कर्मचारी राजीनामा देत आहेत. अनेक ठिकाणी मोठ्या संख्येने कर्मचाऱ्यांनी राजीनामा दिल्याने ट्विटरची कार्यालये बंद ठेवण्यात आली आहेत. राजीनाम्याच्या या सत्रानंतर मस्क यांनी ट्विटरच्या कर्मचाऱ्यांना अल्टिमेटम दिला आहे. कर्मचाऱ्यांना आता ठरवायचे आहे की, त्यांना कंपनीसाठी अत्यंत खडतर परिश्रम करत काम करायचं आहे की, राजीनामा द्यायचा आहे. मस्क यांनी कर्मचाऱ्यांना ईमेलद्वारे नव्याने जारी केलेल्या प्रतिज्ञापत्रावर त्यांची सहमती दर्शवण्यास सांगितली आहे. गुरुवारी संध्याकाळी पाच वाजेपर्यंत कर्मचाऱ्यांना आपली प्रतिक्रिया नोंदवण्यास सांगण्यात आली होती. बुधवारी एलॉन मस्क यांनी दिलेल्या अल्टिमेटमनंतर ट्विटर कार्यालये बंद होत आहेत आणि कर्मचारी मोठ्या संख्येने निघून जात आहेत. नवे मालक मस्क यांनी ट्विटरच्या कर्मचाऱ्यांना कंपनीमध्ये अत्यंत कठोर नियमांचे पालन करण्यास सांगितले आहे. ज्यामध्ये कामाचे तास अधिक असतील. ज्या कर्मचाऱ्यांना हे मंजूर नसेल ते कर्मचारी राजीनामा देऊ शकतात. मस्क यांनी नव्या प्रतिज्ञापत्रावर गुरुवारी सायंकाळी पाच वाजेपर्यंत कर्मचाऱ्यांना स्वाक्षरी करण्यास सांगितली होती. या प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरी न करणाऱ्या कर्मचाऱ्यांना कामावरूनव कमी केले जाणार असून त्यांना तीन महिन्यांचा पगार कंपनीकडून देण्यात येईल, अशी माहिती वॉशिंग्टन पोस्टच्या वृत्तानुसार समोर येत आहे. बुधवारी ट्विटर कर्मचाऱ्यांना मस्क यांनी ईमेल पाठवला होता या ईमेलमध्ये सांगण्यात आले की, 'पुढे जाण्यासाठी, एक यशस्वी ट्विटर 2.0 तयार करण्यासाठी आणि वाढत्या स्पर्धात्मक जगात यशस्वी होण्यासाठी, आम्हाला अत्यंत स्पर्धात्मक असणे आवश्यक आहे.' या ईमेलमध्ये कर्मचाऱ्यांना 'हो' किंवा 'नाही' या पर्यायाची निवड करण्यास सांगण्यात आलं. ज्या कर्मचाऱ्यांनी हो असे उत्तर दिलेले नाही, त्या कर्मचाऱ्यांचा राजीनामा मंजूर करत कंपनी त्यांना तीन महिन्याचा पगार देईल, असंही ईमेलमध्ये सांगण्यात आले. न्यूयॉर्क टाईम्सच्या वृत्तानुसार, या अल्टिमेटम आधी आणि नंतरही ट्विटरच्या शेकडो कर्मचाऱ्यांनी राजीनामे दिले. यानंतर ट्विटर कंपनीने ईमेलद्वारे घोषणा केली की, कंपनीच्या कार्यालयीन इमारती सोमवारपर्यंत बंद ठेवण्यात येतील. सोमवारपर्यंत ट्विटर कंपनी राजीनामा दिलेल्या कर्मचारी इमारतीतील प्रवेशासाठी असलेल्या बॅजची परवानगी काढून टाकेल.

# हा तर कुत्सितपणा



सिद्धेश्वर पवार
संपर्क क्र. 9422880080

आधुनिक केसरी

**मागील कित्येक वर्षांपासून नियोजनपूर्वक राहुल गांधी यांची प्रतिमा हास्यास्पद बनविण्यात काहींना यश आले होते. मोडतोड करून व्हीडिओ तयार करायचे अन ते देशभर व्हायरल करायचे या उद्योगावरच आजपर्यंत टिकून असलेल्याना राहुल गांधींवर शिंतोडे उडवायची आयती संधी मिळाली अन मुळात असलेला कुत्सितपणा जागा होऊन शेवटी त्यांनी आपली पातळी दाखवुनच दिली. खरं म्हणजे भारत जोडो पदयात्रेच्या माध्यमातून जनसामान्यांमध्ये राहुल गांधी यांची वेगळी छबी निर्माण झाली आहे. काळाला कलाटणी देणारी आणि गिनीज बुक मध्ये देखील नोंद होणारी ही पदयात्रा आहे.**




राहुल गांधी हे एकटे चालत नाहीत तर लाखो लोकं, यात आबालवृद्ध, आणि सर्वच घटकातील भारतीय नागरिक स्वयंस्फूर्त चालत आहेत. देश बदल रहा है, अशा पद्धतीने वातावरण या पद यात्रेने निर्माण केले आहे. महाराष्ट्रात नैसर्गिक काँग्रेस आहे. इथल्या कार्यकर्त्यांचा डी एन ए काँग्रेसचा आहे,अशी भावना राहुल गांधींनी पत्रकारांच्या एका प्रश्नावर व्यक्त केली तर ह्या पद यात्रेला उलटपक्षी महाराष्ट्रात सर्वाधिक प्रतिसाद मिळाला असल्याचे सांगून काँग्रेस साठी महाराष्ट्रात वातावरण पोषक आहे, असे देखील राहुल गांधी म्हणालेत.

कुठलेही राजकीय नाटक करता येईल मात्र राहुल गांधी दररोज 20-25 किमी चालत आहेत. लहान मुलांना, तरुण-तरुणींना,वयस्कर मंडळींना भेटत आहेत,चालत-चालत संवाद साधत आहेत. उद्याच्या पिढीशी संवाद साधत आहेत. यामुळे राहुल गांधी यांच्या विषयी जनसामान्यांच्या मनात एक आदराची भावना निर्माण झाली असल्याचे चित्र दिसत आहे.

यामुळे गोंधळून गेलेली ।मंडळी ऐन केन प्रकारे ह्या पद यात्रेला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. अगदी टी शर्ट पासून त्यांच्या खेटरा पर्यंत टीका करण्याची पातळी गाठलेल्याना वाशीम जिल्ह्यातील मेडशी या छोट्या गावातील सभेतील लाऊडस्पीकर वाल्याकडून नकळतपणे घडलेला प्रकार समोर करून राहुल गांधींना बदनाम करण्याचा कुत्स्तीतपणा केल्या जात आहे.

वाशीम जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा आमदार अमित झनक यांच्या मतदारसंघातील मेडशी या छोट्याश्या गावी हजारो लोकांच्या उपस्थितीत राहुल गांधी यांची सभा संपन्न झाली. सदर सभेचा समारोप हा राष्ट्रगीताने करण्यात आला. सूत्रसंचालन करत असतांना मी सदर व्यक्तीस राष्ट्रगीत लावण्याची सूचना केली. यु ट्यूब वर राष्ट्रगीत सर्च करून लावत असतांना संबंधित व्यक्तीकडून ते चुकीचे लागले. नकळतपणे आणि कुठलाही उद्देश नसतांना घडलेला हा प्रकार आ अमित झनक, आणि विशेष म्हणजे राहुल गांधी यांच्या लक्षात येताच राहुल गांधी यांनी स्वतः सदर व्यक्तीस एकदा नव्हे तर 2 वेळा सदर व्यक्तीस व सूत्रसंचालन करत असलेल्या मला सांगितले. आणि ती चूक तात्काळ दुरुस्त करून राष्ट्रगीत गायल्या गेले. मात्र ज्यांच्या आजीने आणि वडिलांनी ह्या देशासाठी रक्त सांडले... आणि जो भीती न बाळगता, आपली आजी आणि वडील शहीद झालेले असतांना, लोकांमधील एकात्मतेची भावना टिकून रहावी, जो सर्वांना एकत्र जोडून ठेवण्यासाठी उन्हातान्हात पायी चालतो आहे. कन्याकुमारी पासून काश्मीर पर्यंत जातों आहे,ज्याच्या परिवाराने भारतमातेसाठी बलिदान दिले,त्याला देशप्रेम शिकविण्याचा अश्लाध्य प्रकार घडतो आहे,तो निंदनियच आहे.. दुसरीकडे शहीद जवानांना देखील पुष्प चक्र अर्पण करतांना चार ही दिशेसह खाली वर कॅमेरे लावून त्यालाच प्राधान्य देणाऱ्यांना मात्र आपण देशभक्त म्हटल्या जाते,अन चुकीचे गीत लागताच जो स्वतःच चूक लक्षात आणून देत सदर व्यक्तीस राष्ट्रगीत लावायला सांगतो,त्याच्या बद्दल खालची पातळी गाठून केवळ बदनाम करण्याच्या हेतूने होत असलेली टीका ही खरंच राष्ट्रप्रेम दाखविणारी आहे का...? नकळतपणे आपण कशाची बदनामी करतोय याचे जरा चिंतन करावे हेच सुचवावेसे वाटते.

# रशियाने पोलंडवर क्षेपणास्त्र डागल्याने नाटो आक्रमक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**गेल्या 9 महिन्यांपासून सुरू असलेला युक्रेन-रशिया संघर्ष शिगेला पोहोचला आहे आणि आता रशियाचे क्षेपणास्त्र थेट पोलंडवर पडल्याने हा संघर्ष आता नाटो विरूद्ध रशिया अशी होण्याची दाट शक्यता आहे.यामुळे तिसऱ्या महायुध्दाची चिंगारी केव्हाही भडकु शकते.पोलंड हा नाटोचा सदस्य देश आहे.त्यामुळे नाटो सदस्य देशांवर हल्ला म्हणजे संपूर्ण नाटो देशांवर हल्ला असे नाटोच्या नियमानुसार गृहीत धरल्या जाते. त्यामुळे नाटो देश रशियाच्या विरूद्ध आक्रमक पवित्रा घेऊ शकते याला नाकारता येत नाही. एकीकडे जी-20 शिखर परिषद सुरू असतांना व यात वैश्विक अर्थव्यवस्थेवरील दिशा आणि दशा यावर विचार विमर्श करण्यासाठी जागातील 20 मोठे देश (जी-20) इंडोनेशियाच्या बाली शहरात शिखर सम्मेलनात युक्रेन-रशिया युद्ध यावर सुध्दा चर्चा सुरू होती.**

या बैठकीत रशिया कडुन व्लादिमीर पुतिन यांच्या ठिकाणी विदेश मंत्री बैठकीला होते.या बैठकीत पुर्णपणे युद्धावर चर्चा हावी रहाली. तर दुसरीकडे रशिया युक्रेनवर क्षेपणास्त्रांचे ताबडतोब हल्ले चढवत होता.रशियाने युक्रेनच्या 12 शहरावर एकाच वेळी 100 क्षेपणास्त्रे डागली यातील एक क्षेपणास्त्र पोलंडमध्ये पडल्याने नाटोमध्ये आक्रोश निर्माण झाला आहे.यात पोलंडचे मोठे नुकसान झाले व दोन लोकांचा मृत्यू झाला.कोणत्याही नाटो देशावरील रशिया कडुन झालेला हा पहिलाच हल्ला समजल्या जात आहे.त्यामुळे अमेरिकेसह संपूर्ण नाटो देश ऍक्शन मोडवर आल्याचे दिसून येते. जर नाटो-रशिया आमने-सामने आले तर तिसरे महायुद्ध अटळ आहे याला कोणीही रोखू शकणार नाही.त्यामुळे हे युद्ध केव्हाही भयावह रूप धारण करू शकते.कारण पोलंड वर डागलेले क्षेपणास्त्रे रशियाने डागली असल्याचे युक्रेनचे म्हणने आहे व नाटोलाही संशय आहे.त्यामुळे नाटो देश हायअलर्ट वर असल्याचे दिसून येते. दिनांक 15 नोव्हेंबर मंगळवारला जी-20 चे संमेलन सुरू असताना रशियाने रात्री कीव, लवीव,खारकीव शहर,पोल्तवा, मेकोलिव, निप्रो, झेतोमर,लिव, चेक्कासे, ओडेसा आणि चेर्निहिव इत्यादी 12 शहरांवर एकाच वेळी 100 मिसाईले डागुन युक्रेनला मोठे नुकसान पोहोचविले.लवीव या पावर हाऊस वर रशियाने हल्ला केल्याने विज पुरवठा पुर्णपणे खंडीत झालेला आहे.या भयावह हल्ल्यामुळे अनेक शहरांची विज पुर्ती खंडीत झाली आहे व अनेक शहरांत अंधकार निर्माण झाल्याचे सांगितले जाते.सध्याच्या परिस्थितीत 12 शहराची हालत अत्यंत गंभीर असल्याचे सांगितले जाते.रशियाने या अगोदर 10 आक्टोंबर 2022 ला एकाच वेळी 84 क्षेपणास्त्रे डागली होती आणि आणि आता15 नोव्हेंबरला 100 मिसाईल डागुन व पोलंड वर अटॅक करून तिसऱ्या महायुध्दाचा आलाराम रशियाने वाजविल्याचे दिसून येते.असे वाटत होते की युद्ध बंदी होवू शकते कारण दोन दिवस अगोदर खेरसॉन मधुन रशियाचे सैन्य मागे परतण्यास सुरूवात झाली होती यामुळे युद्ध विराम होण्याची शक्यता वाढली सुद्धा होती.परंतु मंगळवारला अचानक रशियाने 12 शहरांव 100 क्षेपणास्त्रे डागल्याने व एक क्षेपणास्त्र पोलंड डागल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.त्यामुळे युक्रेनच्या अनेक शहरांमध्ये आपातकाल घोषित करण्यात आलेला आहे. युक्रेन-रशिया युद्ध दिवसेंदिवस भयावह रूप धारण करीत आहे. कारण रशियाचे आतापर्यंत एक लाख पेक्षा जास्त सैन्य या युद्धात मारल्या गेले त्यामुळे व्लादिमीर पुतिन मागे हटण्यास तयार नाही. परंतु जागतिक शांततेसाठी जी-20 देशाने कूटनीतीचा वापर करून ताबडतोब रशिया- युक्रेन मधील युद्ध थांबविले पाहिजे.कारण युद्धामुळे कोणत्याही प्रकारचा समाधानकारक मार्ग निघणार नाही हेही तेवढेच सत्य आहे.त्यामुळे जी-20 देशांनी ताबडतोब युद्ध थांबविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करायला हवेत.अन्यथा अनर्थ होऊ शकतो.कारण आज जगाला युध्दाची गरज नसुन शांततेची गरज आहे.रशिया-युक्रेन युद्धात मानवीय हानी होत आहेच यात दुमत नाही.परंतु मानवी हाणीच्या दुप्पटीने वन्यप्राणी,जीव-जंतु,पशु-पक्षी यांना या विनाशकारी युद्धामुळे आपले प्राण गमवावे लागत आहे.सोबतच निसर्गाचा सुद्धा ह्यास होत आहे.या संपूर्ण गोष्टी लक्षात घेऊन जनकल्याणाच्या दृष्टीकोणातुन जी-20 देशांनी रशिया-युक्रेन युद्ध ताबडतोब थांबविले पाहिजे. सध्याचा काळ युद्धाचा किंवा युद्धजन्य परिस्थिती निर्माण करण्यासाठी चढाओढ करण्याचा नसून सर्वांनी आपली आर्थिक बाजू सावरण्याचा आहे.कारण गेली दोन वर्षे संपूर्ण जगाने अनेक वेदना भोगल्या आहेत.त्या जखमा अजून भरून निघायच्याच आहे,तर जगापुढे तिसऱ्या महायुध्दाची सावट दिसत आहे याला रोखणे काळाची गरज आहे.आज क्षेपणास्त्रे परिक्षण व युद्धांमुळे जंगल संपदा नष्ट होत आहे यामुळेच जगातील हजारो प्राण्यांना आपले प्राण गमवावे लागत आहे. ह्या संपूर्ण घटनांना युद्धच कारणीभूत आहे.पोलंडमध्ये क्षेपणास्त्र पडल्याने जगभरात युध्दाची भीती निर्माण झाली असतांनाच रशियाने दुसऱ्या दिवशीही सुध्दा युक्रेनवर ड्रोन आणि क्षेपणास्त्राचे भीषण हल्ले चढविले.म्हणजे परिस्थिती शांत न होता चिघळत असल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे गुरूवार दिनांक 17 ला युक्रेनच्या दक्षिणी ओडेसा आणि निप्रो शहरावर क्षेपणास्त्रांनी आणि ड्रोनने जबरदस्त मारा केला यामुळे जीवीत हानी व मोठे नुकसान झाले आहे.म्हणजे दोन्ही बाजूंनी युद्ध भयावह स्थितीमध्ये येवून ठेपले आहे.त्यामुळे जी-20 देशांनी मानव कल्याणासाठी युद्ध रोखण्याची नितांत गरज आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महान पंतप्रधान इंदिरा गांधी



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**भारताच्या सर्वात सामर्थशाली पंतप्रधान इंदिरा गांधी यांची आज १०५ वि जयंती. इंदिरा गांधींची भारतातीलच नव्हे तर जगातील सर्वात सामर्थ्यशाली आणि महत्वपुर्ण नेत्यांमध्ये गणना होते. १९ नोव्हेंबर १९१७ रोजी त्यांचा जन्म झाला. इंदिरा गांधी यांना इंदिरा हे नाव आजी आजोबांकडून मिळाले. पण लहानपणी सर्वजण त्यांना प्रियदर्शनी म्हणून बोलवायचे. आई कमला नेहरु आणि वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याकडून त्यांना देशप्रेमाचे बाळकडू मिळाले. लहानपणीच त्यांच्यावर देशभक्तीचे संस्कार झाले. कारण त्यांचे पूर्ण कुटुंबच स्वातंत्र्य लढ्यात अग्रणी होते.**

लहानपणापासूनच स्वदेश आणि स्वदेशी याविषयी त्यांच्या मनात प्रेम निर्माण झाले. अगदी लहान असतानाच त्यांनी विदेशी खेळणी व कपड्यांची होळी केली होती. एका पाहुण्यांनी त्यांच्यासाठी विदेशातून आणलेला किंमती फ्रॉक परिधान करण्यास त्यांनी नकार दिला होता. आजोबा मोतीलाल नेहरू व वडील पंडित जवाहरलाल नेहरू यांचे देश स्वातंत्र्य करण्यासाठी चालू असलेले आंदोलने पाहून आपणही या आंदोलनात सहभागी व्हावे असे त्यांना वाटे. वयाच्या अवघ्या १३ वर्षी म्हणजे सण १९३० साली त्यांनी आपल्या सवंगड्यांसह वानरसेना नावाची संघटना स्थापन केली आणि नेत्यांचे संदेश पोहचवण्याचे काम केले. इंग्रजांविरुद्ध मिरवणुका काढल्या, घोषणा दिल्या. त्यांचे सुरवातीचे शिक्षण अलाहाबाद, पुणे इथे झाले पुढे त्या रवींद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन येथे शिक्षण घेण्यासाठी गेल्या. तिथे त्यांनी शिक्षणासोबत विविध कलाही आत्मसात केल्या. वडील पंडित जवाहरलाल नेहरू स्वातंत्र्याचा आंदोलनात अग्रणी असल्याने बऱ्याच वेळा ते तुरुंगातच असायचे अशा वेळी इंदिरा याच आई कमला नेहरू यांची काळजी घ्यायच्या. १८ फेब्रुवारी १९३६ रोजी कमला नेहरू यांचे निधन झाले तेंव्हा त्यांना खूप दुःख झाले. या दुःखातून सावरण्यासाठी वडील पंडित नेहरू यांनी त्यांना विदेशात शिकण्यासाठी पाठवले. विदेशातून शिक्षण पूर्ण करुन आल्यावर २६ फेब्रुवारी १९४२ रोजी फिरोज गांधी या उमद्या व देखण्या तरुणाशी त्यांनी विवाह केला. विवाहानंतर फिरोज गांधी व इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्याचा चळवळीत भाग घेतला. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर त्या संसारात रमल्या. राजीव आणि संजीव या दोन मुलांच्या पालनपोषणातच त्यांचा वेळ जाऊ लागला. पुढे त्या काँग्रेसमध्ये सक्रिय झाल्या. १९५९ साली त्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अध्यक्षा बनल्या. यावेळी त्यांनी पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी खूप काम केले. १९६० साली पती फिरोज गांधी तसेच १९६४ साली वडील पंडित नेहरू यांचे निधन झाले तरी त्या खचल्या नाहीत. कठीण परिस्थितीतही त्या खंबीरपणे उभ्या राहिल्या. लाल बहाद्दूर शास्त्री यांनी त्यांना मंत्रिमंडळात माहिती प्रसारण आणि नभोवाणी खात्याच्या मंत्रीपदाची जबाबदारी दिली त्यांनी ती लीलया पेलली. लाल बहाद्दूर शास्त्रींच्या मृत्यूनंतर २४ जानेवारी १९६६ रोजी त्या देशाच्या पंतप्रधान बनल्या. त्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. त्यांनी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतली पण त्यावेळी देशाची परिस्थिती खूप बिकट होती. भारत पाकिस्तानचे युद्ध झाले होते. देशात मोठा दुष्काळ पडला होता. अन्नविषयक मदतीचा पी एल ४८० कराराचे नूतनीकरण करण्यास अमेरिकेने नकार दिला होता. या आर्थिक परिस्थितीतुन मार्ग काढत असतानाच १९६७ सलची निवडणूक आली अनेक राज्यात काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला. लोकसभेत काँग्रेसचे संख्याबळ घटले. त्यामुळे पक्षातील सिंडिकेट नेत्यांनी उचल खाल्ली. पंतप्रधान इंदिरा गांधींनी आपल्या इच्छेप्रमाणे कारभार करावा असे त्यांना वाटत होते. त्यामुळे इंदिरा गांधी आणि त्यांच्यात वाद होऊ लागले त्यातूनच काँग्रेसमध्ये उभी फूट पडली. जेष्ठांची सिंडिकेट विरुद्ध तरुणांची इंडिकेट असा उभा संघर्ष झाला. काँग्रेसमधील तरुण नेत्यांनी इंदिरा गांधी यांना साथ दिली. राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत इंदिरा गांधी यांनी सिंडिकेटचे उमेदवार नीलम संजीव रेड्डी यांचा पराभव करुन व्ही व्ही गिरी यांना राष्ट्रपती बनवले. सिंडिकेटचा दारुण पराभव झाल्याने इंदिरा गांधी सामर्थ्यवान बनल्या. मंत्रिमंडळात त्यांनी बदल केले. उपपंतप्रधान मोरारजी देसाई यांच्याकडील अर्थखाते त्यांनी स्वतःकडे घेऊन मोरारजी देसाई यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यानंतर त्यांनी अनेक धाडसी निर्णय घेतले. १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण करणे, संस्थांनीकांचे



तनखे रद्द करणे असे निर्णय घेऊन त्यांनी खळबळ उडवून टाकली त्यांच्या या धाडसी निर्णयाला अनेकांनी विरोध केला पण आपल्या निर्णयापासून त्या तसूभरही मागे हटल्या नाही. १९७१ साली झालेल्या मुदतपूर्व निवडणुका त्यांनी एकहाती जिंकल्या. यानिवडणुकीत त्यांनी गरिबी हटाव ही घोषणा दिली. त्यांची ही घोषणा खुप गाजली. गोरगरिबांनी त्यांना भरभरुन मते दिली. याचवेळी पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तान यांच्यात मोठा संघर्ष सुरू झाला. पूर्व पाकिस्तानातून एक कोटी निर्वासित भारतात आले. त्यामुळे अर्थव्यवस्थेवर ताण पडला. पूर्व पाकिस्तानला भारत मदत करीत आहे म्हणून पश्चिम पाकिस्तानने भारताविरुद्ध युद्ध पुकारले. अमेरिकेने भारताला धमकी देत त्यांचे सातवे आरमार बंगालच्या उपसागरात पाठवले पण त्या घाबरल्या नाहीत त्यांनी जनतेला आणि सैनिकांना विश्वास दिला या विश्वासाच्या जोरावरच भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला आणि बांगलादेश नावाचे नवे राष्ट्र उदयास आणले. पाकिस्तानचे एक कोटी सैनिक भारताला शरण आले.

यावेळी त्यांनी दाखवलेल्या धाडसाची आणि नेतृत्वगुणाची जगाने दखल घेतली. जागतिक राजकारणातील एक सामर्थ्यशाली नेत्या म्हणून त्या उदयास आल्या. देशातही त्यांची लोकप्रियता शिखरास पोहचली. विरोधी पक्षनेते अटल बिहारी वाजपेयी यांनी त्यांना दुर्गेची उपमा दिली. १९७५ साली त्यांनी सिक्कीमचे भारतात विलीनीकरण केले तर १९७६ साली अणुस्फोट करुन देशाला अणुऊर्जेत स्वयंपूर्ण बनवले. २६ जून १९७५ रोजी त्यांनी देशावर लादलेली आणीबाणी मात्र लोकांना रुचली नाही त्यामुळे १९७७ साली झालेल्या निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला पण तीन वर्षाने १९८० साली त्या बहुमताने विजयी झाल्या. १९८४ साली पंजाबमधील पवित्र सुवर्ण मंदिरात खलिस्तानवादी अतिरेकी ठाण मांडून बसले होते. देशाची दुसरी फाळणी करुन स्वतंत्र खलिस्तान देश निर्माण करणे ही त्यांची मागणी होती त्यांचा जर लवकर बिमोड केला नाही तर देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेला मोठा धोका आहे हे ओळखून या अतिरेक्यांना सुवर्ण मंदिरातून हुसकावून लावण्यासाठी ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबविण्याचा निर्णय त्यांनी घेतला. हा निर्णय घेऊ नये असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला या मोहिमेमुळे अतिरेकी त्यांचा जीव घेण्यासही मागे पुढे पाहणार नाहीत असा सल्ला त्यांना अनेकांनी दिला पण देशाच्या अखंडतेसाठी त्यांनी हा निर्णय घेतला. सुवर्ण मंदिरात ऑपरेशन ब्ल्यू स्टार मोहीम राबवून अतिरेक्यांना बाहेर काढण्यात आले. अनेक अतिरेक्यांचा खात्मा करण्यात आला. भिंद्रनवाले हा अतिरेकी या कारवाईत मारला गेला. या मोहिमेने दुखावलेल्या त्यांच्या अंग रक्षकानींच ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी त्यांच्यावर गोळीबार केला त्यात त्यांचा दुःखद अंत झाला. त्यांच्या मृत्यूने भारतातच नव्हे जगात शोककळा पसरली. देशाच्या सार्वभौमत्व आणि अखंडतेसाठी हौतात्म्य पत्करणाऱ्या इंदिरा गांधी यांना भावपूर्ण आदरांजली!

# स्वप्नातील या प्रेमाला, या नात्याला काय नाव देऊ

आधुनिक केसरी

**माझ्या काळजात तिच्या आठवणीचे प्रतिबिंब साकारलेले आणि माझ्या हृदयावार राज्य करणारी ती स्वप्नातली राजकुमारी...आमची ओळख होऊन कित्येक वर्ष लोटलेले...आज 'अब के बरस' फिल्म नजरेत उतरली आणि असं वाटलं या फिल्मपेक्षा आमची लव्ह स्टोरी काही वेगळी नाही. पण वेगळेपण मात्र नक्कीच आहे. पण माझ्या आर्टिकलच्या पात्रात ही वास्तविकतेची छटा प्रत्येकात तिच्या प्रेमाचं निरागस रुप साकारलेलं असेल... तिला माहित आहे. मी नेहमी माझ्या विचारावर ठाम असायचा, की मी कधीच प्रेमात पडणार नाही. पण तिच्यासोबत बोलताना मी तिच्यात हरवून जायचा...प्रेम या अडीच अक्षरी शब्दापासून नेहमी दूर पळत असलेला मी या प्रेमाच्या जाळ्यात मात्र नकळत गुंतल्या गेलो.**

या प्रेमाच्या जाळ्यातून सुटका करायची म्हटलं तर तारेवरची कसरत असावी बहुतेक...'प्रेम' या शब्दात केवढं मोठं सामर्थ्य दडलेलं आहे. हे आज कळतंय... या प्रेमाचा आस्वाद घेतलाय; पण फक्त स्वप्नात...मधाळ रात्री, स्वप्नांच्या कुशीत एक जगण्याची आस देऊन गेली ती...तो केवळ भास होता की एक विचार; पण तिचा पाठलाग मी अक्षरशः स्वप्नातच केला...ती चाहूल न जाणता माझ्या मनाला हवीहवीशी वाटली...ती वेगळी दुनिया आपलीशी वाटायला लागली. समुद्राच्या लाटा नि त्या दोन किना-यासोबत, चांदण्याच्या प्रकाशझोत किरणांखाली वेड्यासारखा तिला शोधत
सुटलेला मी...

खूप वेगळी वाटते प्रेमाची दुनिया. तिने मला प्रेम करायला शिकवलं. कुणी एकमेकांना भेटल्यावर आपल्या मनातली गोष्ट सांगत असेल. मी तर तिला कधी बघितलंही नव्हतं आणि तिही मला बघितलेलं नाही. मी फक्त तिचं मन ओळखलेलं होतं. एवढं कसं बरं मन जुळतं! न बघताच ती मला 'आय लव्ह यू' म्हटलं. मी तिच्यावर प्रेम तर करायचा; पण तिला तेव्हा हो म्हटलं नाही. जेव्हा प्रेम म्हटलं तर भीती वाटायची आणि तिच्या 'आय लव्ह यू' या एका वाक्यातल्या तीन शब्दाने माझी रात्रभराची झोप उडाली. मनाला ते वाक्य सतावत होते. अजून कितीतरी रात्रीने माझी झोप उडाली असती. जास्त दिवस नाही, फक्त एका रात्रीचा आढावा घेतला आणि दुस-या दिवशी बारा वाजता तिला हो म्हटलं. तिचं मन एवढं पवित्र आणि हळवं आहे की मी तिचा चेहराही इमेज नाही करायचा...कॉलवर जेव्हा तिच्यासोबत बोलायचा, तेव्हा वाटायचं असंच बोलत राहावं. आजही मन तिचा आवाज ऐकायला माझे कान आतुरलेले असतात.

प्रेम ही गोष्टच किती आल्हाददायक आहे ना, बघितलं तर किनारा...ज्या किना-यावर रोज भेटावं आणि प्रेमाच्या तुडूंब सागरात पोहावं...फार नशिबवान असतात ती लोकं ज्याचं या आयुष्यात त्याच्यावर कुणी तरी प्रेम करणारं असतं. माझ्या नशिबाचे रेशमीबंध तिच्यासोबतच बांधलेले...ती खरंच खूप गोड आहे. माझी खूप जवळची जिवलग मैत्रिण आणि त्याहीपेक्षा जास्त माझं प्रेम आहे ती...आठवत असेल तिला मी एकदा म्हटलं होतं की, मी तुझ्यावर खूप प्रेम करतो गं! तर ती म्हणाली, " हो! डोळे लावून तुमच्यावर माझा विश्वास आहे." तिला माहित आहे. जेव्हा ती माझ्या आयुष्यात आली, तेव्हा मला जगण्याला नवी दिशा मिळाली.

आयुष्यात किती दुःख असताना पण माझ्या प्रत्येक सुख-दुःखात ती सहभागी असायची...मला माझं आयुष्य माझ्या आवडत्या व्यक्तीच्या संगतीमध्ये घालवायला खूप आवडतं. तिचं एज्युकेशन छान झालं आणि तिला तिचं स्वप्न साकार करायचं होतं. ते पूर्ण होईपर्यंत असंच दूर राहावं लागेल. कदाचित स्वप्न पूर्ण झाल्यानंतरही प्रत्यक्षात एकमेकांसमोर येवून भेट होईल की नाही माहित नाही. पण मनाने मात्र नक्कीच जवळ आहोत.

मनात प्रेम खूप आहे, पण व्यक्त करता येत नाही. तिची काळजी खूप आहे, पण दाखविता येत नाही. लिहिण्याची फार आवड आहे. ती जे जे माझ्यासाठी केलं ते, तिचे रूप, तिच्यासोबतचे क्षण...यांची शिदोरी सोबत आहे. ती ह्रदयाच्या कप्प्यात नेहमीसाठी जपलेले...तरीही तिचा विचार करता शब्दही का अबोल होतात, यावर प्रश्नचिन्ह आहे. कल्पना करून काल्पनिक कथा करताना त्यांना त्या कथेत वेगळे



करताना मनाला कसलेही घाव होत नाही; पण ती दूर जाण्याची कल्पनाही सहन होत नाही...या नात्याला, या प्रेमाला काय नाव द्यायचं? हेही कळत नाही. एकमेकांशी भांडल्याशिवाय रुसवा, फुगवा येत नाही. रुसव्या, फुगव्याशिवाय दुरावाही येत नाही... दुराव्याशिवाय जीवनात एकमेकांची गरजही कळत नाही. पाहिलं तर वाटतं जीवन खूप छान आहे; पण जीवनाच्या रस्त्यावरील काटे गळल्याशिवाय अश्रूही येत नाही. हातात हात घेऊन क्षितिजापल्याड जावंसं वाटतं; पण सत्य हेच की, क्षितिजापलिकडं कुणालाही जाता येत नाही. मोठमोठ्या गोष्टी कराव्याशा वाटत नाही. पण वचनाशिवाय प्रेमात विश्वासाची पोकळी भरूनही निघत नाही. कळतच नाही काय विचार करावं..? हे विचार विचारात पाडतात...विचारांवर विचारांचा मारा होतो. शेवटी मन अस्वस्थ होतं. वाईट बोलायला आवडत नाही; पण मन अस्वस्थ असताना वाईट केव्हा बोलून टाकतो हे स्वतःलाही कळत नाही. सगळेच म्हणतात, हे प्रेम नसते... वयाचं आकर्षण असतं. जर सगळंच आकर्षण असतं तर प्रेम कसं मरत नाही? मग प्रेमाचं अस्तित्वच दिसत नाही. मन सांगतं ही ओढ म्हणजे प्रेम आहे. ह्रदय म्हणतं हे ह्रदयाचे जोरजोरात धडधडणे म्हणजे प्रेम आहे. दिमाखावर जोर टाकल्यास वाचलेल्या प्रेमाच्या अनेक व्याख्यांवरून तोही म्हणतो, हे प्रेम आहे. मग आकर्षण काय आहे..? या नात्याचं नाव तरी
काय आहे..?

तिला ठेच लागली की, अश्रू मला का यावे..? हे भाव काय आहेत..? तिचा भूतकाळ डोळ्यांसमोर उभा राहताना...तिला भारी दुःखात पाहताना...मन बेचैन होते, ह्रदयाला कोरल्यागत होते. मन फार दुखते...हे घाव काय आहेत..? तिचा भूतकाळ समोर उभा राहताना तिला आनंद द्यावंसं वाटतं; पण ते क्षण आता हातात नाहीत आणि जे आहेत त्या क्षणात कधी मुलगा म्हणून तर कधी इतर जबाबदारी म्हणून याही क्षणात आनंद देता येत नाही. मनाला दुखावतो...आईबाबांचा विचारच येत नाही, असं त्यांना वाटतं. पण त्यांचा विचार येतो. प्रियकर म्हणून तिच्याच विचारात राहिल्याने इतर गोष्टींकडे दुर्लक्ष होतं...पण मग...माझ्या भावनांचं काय..? कुठे दबवू तिच्याशिवाय अपूर्ण वाटणारी भावना...तिच्यासोबत जगण्याची, हसण्याची भावना... डोक्या, खांद्यावर डोकं ठेवून रडण्याची भावना...तिच्यासोबत जुळलेल्या मनाला आवडणा-या प्रत्येक भावना...मनाला आवडणारी गोष्ट झाली की, मन खुश असते ना...मग विविध जबाबदा-यांत मनालाच तर मारावं लागतं. स्वतःलाच खूश ठेवू शकलो नाही तर काय जीवन...काय दुस-यांच्या चेह-यावर हास्य आणता येणार...मग काय करायचं..? प्रेम निभवायचं...फक्त निभवायचं की, पूर्ण निष्ठेनं निभवायचं. परत तोच प्रश्न निभवत असलेल्या नात्याला, प्रेमाला काय नाव द्यायचं..?

तिच्यावर लिहायला बरंच काही आहे. पण लिहिताना काय लिहू आणि काय नाही असं होऊन शब्दही अबोल होतात. आठवणींच्या पालव्या गडून पडतात आणि भेटीच्या क्षणांना नजरेत साठवतं. क्षितिजापल्याड जाऊन चंद्र मावळतो, तसा काहीसा न मिटणारा, न संपणारा तिचा-माझा जीवनप्रवास अधोरेखित होतो...अजून आयुष्य पूर्णपणे जगलेलो नाही; पण आयुष्यात ती मिळावी हेच माझं अहोभाग्य समजतो. आठवणी आणि तिच्या-माझ्या प्रेमाचे विणलेले क्षण तिच्यापर्यंत पोहचविण्याचा हा छोटासा प्रयत्न...तिला नक्कीच आवडेल. चला, उगीच ती माझी काळजी करत बसेल...ती माझ्या काळजीत पडायला नको...तिने स्वतःकडे लक्ष द्यायला हवं... स्वतःचं ध्येय साध्य करायला हवं. पुरे आता! शब्द लांबत चालले. पूर्ण विराम घेतोय मी... बांधली होती गाठ त्याने आमच्या पवित्र नात्याची नियतीलाच मान्य नव्हतं की नजर लागली कुणाची...

सुनील शिरपुरे
कमळवेल्ली, यवतमाळ
संपर्क : ७०५७१८५४७९

# सावरकरांविषयी राहुल गांधी सत्यच बोलले

## महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधींनी केली पाठराखण!

आधुनिक केसरी न्यूज

**शेगाव :** काँग्रेस खासदार राहुल गांधींनी स्वातंत्र्यवीर सावरकरांविषयी केलेल्या विधानावरून महाराष्ट्रातले राजकारण चांगलेच तापले आहे. राहुल गांधींच्या विधानाला भाजपा आणि मनसेसोबतच महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असणाऱ्या ठाकरे गटाकडूनही विरोध केला जात आहे. या पार्श्वभूमीवर राहुल गांधींनी केलेले विधान योग्य की अयोग्य? अशी चर्चा सुरू असताना राहुल गांधींनी आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ पत्रकार परिषदेत काही कागदपत्रही सादर केली. यावरून एकीकडे मनसेकडून राहुल गांधींच्या शेगावमधील यात्रेला विरोध करण्यासाठी आंदोलन केले जात असताना आता महात्मा गांधींचे पणतू तुषार गांधी यांनी राहुल गांधींच्या वक्तव्याचे समर्थन केले आहे. राहुल गांधी खरे तेच बोलले, असे तुषार गांधी म्हणाले आहेत.

तुषार गांधी आज शेगावमध्ये राहुल गांधींच्या यात्रेमध्ये सहभागी होण्यासाठी दाखल झाले आहेत. यासंदर्भात त्यांनी गुरुवारी संध्याकाळी ट्वीट केले होते. यामध्ये महात्मा गांधी आणि पंडित जवाहरलाल नेहरू एकत्र चालत असतानाचा एक जुना फोटो ट्वीट केला होता. त्यासोबत आपण राहुल गांधींच्या यात्रेमध्ये सहभागी होणार असल्याची माहिती त्यांनी ट्वीटद्वारे दिली होती. त्यानंतर आज टीव्ही ९ शी बोलताना तुषार गांधी यांनी राहुल गांधी यांची भारत जोडो यात्रा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांबाबतचे त्यांचे वक्तव्य यासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली. ज्यांना जी भूमिका घ्यायची आहे, ते ती भूमिका घेऊ शकतात. आपण एकमेकांच्या भूमिकांचा आदर करायला शिकले पाहिजे. पण आज सामाजिक जीवनात ते दिसत नाही. वेगळ्या मतांचा आदर करणे शिकायला हवे लोकांनी. मनसे, भाजपाची भूमिका वेगळी असू शकते. आम्ही कुठे त्यांना सांगतो की तुम्ही अशी भूमिका घेतली तर आम्ही तुम्हाला महाराष्ट्रातून हाकलून लावू. त्यांना आहे तो अधिकार आम्हालाही आहे", अशा शब्दांत त्यांनी भाजपा आणि मनसेच्या विरोधाचा समाचार घेतला.

**सत्य सांगण्याचे धाडस असायलाच हवे**

राहुल गांधींनी जे सत्य आहे ते सांगितले आहे. सावरकरांनी इंग्रजांची मदत केली होती. त्यांची माफी मागितली होती. इंग्रजांकडून पेन्शन घेतली होती. जर आपण सत्य सांगायला घाबरलो, तर आपण सत्याशी दगाबाजी करतो", असे ते म्हणाले. "राहुल गांधींनी मांडलेले मत अगदी योग्य आहे. सावरकर एकेकाळी क्रांतीकारी होते. त्यानंतर त्यांनी इंग्रजांशी हातमिळवणी केली आणि पूर्ण आयुष्य इंग्रजांशी ते इमानदार राहिले. हे आपण सांगण्यात काहीच चुकीचे नाही. सत्य सांगायचे धाडस असायलाच हवे ते कुणी सांगत नसतील, तर ते सत्याला घाबरतात हे स्पष्ट दिसते ज्यांना सत्य माहिती आहे, त्यांनी जर सत्य लपवले तर सत्याशी त्यांनी निष्ठा नाहीये हे कळून येते, असेही तुषार गांधी म्हणाले.



## सुधाकर देशमुख यांना छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** अंबाजोगाई तालुक्यातील ममदापूर येथील वृक्षमित्र सुधाकर गायकवाड यांना 2018-2019 या वर्षाचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. यंदाच्या आधुनिक केसरीच्या "ज्योतिर्मय " 2022 दिवाळी अंकात सुधाकर देशमुख यांच्या अनोख्या कार्याची नोंद व्यक्तिविशेष मध्ये लेखक बाळासाहेब जोगदंड यांनी घेतली आहे. वृक्ष चळवळीसाठी गेल्या 42 वर्षांपासून लढा देणा-या सुधाकर देशमुख यांच्या कार्याची अनोखी कहाणी आहे. झाडे लावली तर ती जगली पाहिजे. माणसांची जणगणना होते त्याचप्रकारे माणसांची देखील गणना झाली पाहिजे यासाठी सलग 12 वर्ष आपल्या कुटुंबासमवेत सुधाकर देशमुख संघर्ष करतात. शासनस्तरावर लढा देतात. प्रतेक गावात वृक्षपालक नेमणे, प्रतेक गावात झाडांचे फलक लावणे,शेतकऱ्यांना संवर्धनासाठी अनुदान देणे यासाठी सतत कार्यरत राहिलेल्या सुधाकर देशमुख यांचा संघर्ष कायम राहिला. आणि म्हणूनच त्यानी 35 दिवस राबवलेल्या विशेष मोहिमेत त्यांच्या शेतातील वृक्षासाठी अलीकडेच वृक्ष गणनेचा पहिला पीटीआर मिळाला. यंदाच्या आधुनिक केसरीच्या "ज्योतिर्मय " 2022 दिवाळी अंकात सुधाकर देशमुख यांच्या अनोख्या कार्याची विशेष नोंद व्यक्तिविशेष मध्ये लेखक बाळासाहेब जोगदंड यांनी घेतली आहे. या पुरस्काराचे 10 डिसेंबर 2022 पूर्वी विभाग स्तरावर वितरण करावे असे दि. 17 डिसेंबरच्या शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. पुरस्कार निवडीबद्दल सुधाकर देशमुख यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## धुळे तालुका पोलीसांची दमदार कारवाई



आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** तालुका पोलिसांनी दुहेरी कामगिरी करीत लाखोचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.आर्वी शिवारात सापळा रचून वाहनासह २६ लाखांचा गुटखा आणि तंबाखूचा माल जप्त केला तर मांडळ शिवारातील गांजा शेतीवर नांगर फिरवित ५ लाखांची गांजाची झाडे जप्त केली. आयसर ट्रकमधून बेकायदेशीररित्या रजनीगंधा पानमसाला गुटख्याची वाहतुक नाशिक रोडने केली जाणार असल्याची गुप्त माहिती काल धुळे तालुका पोलिस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांना गुप्त माहिती मिळाल्यानुसार त्यांनी पथकाला कारवाईचे आदेश दिले. पथकाने रात्री सापळा लावून आर्वी दूरक्षेत्र येथे संशयीत आयशर वाहनाला पकडले. तपासणी केली गोण्यांमध्ये रजनीगंधा पानमसाला गुटखा व तुलसी तंबाखुचे एकूण १२ पार्सल आढळून आले. १३ लाख ९९ हजार ६८० रुपये किंमतीचा रजनीगंधा पानमसाला (गुटखा) एकूण १२ पार्सल बॉक्स १ लाख ५५ हजार ५२० रुपये किंमतीचा रजनीगंधा पान मसाल्याचे 3 पार्सल खाकी बॉक्स ३ लाख ७६ हजार ३२० रुपये किंमतीची तुलसी तंबाखुचे २ पार्सल बॉक्स व ७ लाखांचे आयसर वाहन असा एकुण २६ लाख ३१ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्यमाल जप्त करण्यात आला आहे. याबाबत अन्न व औषध प्रशासन विभागाल अहवाल नोंद करण्याचे काम उशिरापर्यंत सुरु होते. तसेच दि. १५ रोजी तालुका पोलिसांनी मांडळ शिवारातील कपाशीच्या आड केलेल्या गांजा शेतीवर कारवाई केली. एकुण ५ लाख ९ हजार ९ ७० रुपयांची गांजाची लहानमोठी १७७ झाडे जप्त करण्यात आली. या प्रकरणी प्रविण भावलाल पाटील रा मांडळ ता . धुळे याच्याविरोधात गुन्हा दाखल झाला आहे . ही कारवाई पोलीस महानिरीक्षक बी.जी. शेखर पाटील, पोलीस अधीक्षक संजय बारकुंड अपोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप मैराळे, पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सागर काळे, पोहेको प्रविण पाटील, किशोर खैरनार, पोना मुकेश पवार, पोकॉ नितीन दिवसे यांनी केली आहे. या कारवाई संदर्भात धुळे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांनी संपूर्ण पोलीस कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहे.

## प्रा.आनंद तेलतुंबडे यांना उच्च न्यायालयाकडून जामीन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शहरी नक्षलवादाच्या आरोपाप्रकरणी सध्या तळोजा कारागृहात बंदिस्त असलेले प्रा. आनंद तेलतुंबडे यांना उच्च न्यायालयाने शुक्रवारी जामीन मंजूर केला. एप्रिल २०२० पासून तेलतुंबडे अटकेत आहेत. याच मुद्यावर उच्च न्यायालयाने तेलतुंबडे यांना जामीन मंजूर केला. या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देत यावे यासाठी त्याला एक आठवड्याची स्थगिती द्यावी, अशी मागणी राष्ट्रीय तपास यंत्रणेने (एनआयए) केली. ती न्यायालयाने मान्य केली व तेलतुंबडे यांना जामीन देण्याच्या निर्णयाला एक आठवड्याची स्थगिती दिली.

न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती मिलिंद जाधव यांच्या खंडपीठाने तेलतुंबडे यांनी नियमित जामिनासाठी केलेली याचिका योग्य ठरवली. तसेच रोख रक्कम सादर करून जामिनावर सुटका करण्याची तेलतुंबडे यांचे वकिल मिहिर देसाई यांनी केलेली मागणीही न्यायालयाने मान्य केली.

विशेष न्यायालयाने जामीन फेटाळल्यानंतर तेलतुंबडे यांनी उच्च न्यायालयात धाव घेऊन जामिनाची मागणी केली होती. २१ डिसेंबर २०१७ रोजी झालेल्या एल्गार परिषदेला आपण अनुपस्थित होतो. त्यामुळे चिथावणीखोर भाषण देण्याचा आणि या प्रकरणाचा आपल्याशी काही संबंध नाही, असा दावा तेलतुंबडे यांनी जामिनाची मागणी करताना केला होता. तर तेलतुंबडे हे एल्गार परिषद आयोजित करणाऱ्यांपैकी एक होते. शिवाय ते सीपीआय (माओवादी) या बंदी घालण्यात आलेल्या संघटनेचे सक्रिय सदस्य आहेत, असा दावा एनआयएतर्फे वकील संदेश पाटील यांनी तेलतुंबडे यांच्या जामिनाला विरोध करताना केला होता.

## साखर कारखान्याची वाहने रोखली तर साखर सम्राटांना पायदळी तुडवू : राम राजोळे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड रामभाऊ आवारे**

**निफाड :** रानवड सहकारी साखर कारखान्याकडे जाणारी ऊस वाहतूक करणारी वाहने रोखण्यात आली दरम्यान साखर सम्राटाचे आंदोलन मोडीत काढण्याचे षडयंत्र यशस्वी होवू देणार नाही, साखर सम्राटांना पायदळी तुडवू असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे निफाड तालुका अध्यक्ष राम राजोळे यांनी दिला आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेने निवेदन दिले त्यावेळी त्यांनी सर्व वाहतूक बंद करण्याचे आश्वासन कारखाना प्रशासनाने दिले होते मात्र ते पाळले नाही. त्यामुळे संतप्त तालुक्यातील व परिसरातील कार्यकर्त्यांनी सर्व ऊस वाहने रोखली त्यांची हवा सोडण्यात आली. यावेळी वाहतूकदार व कार्यकर्त्यांच्या मध्ये बाचाबाची झाली मात्र नंतर वाहतूकदार यांनी मवाळ भूमिका घेत सहकार्याची भूमिका घेतली. यावेळी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली साखर सम्राटांचे करायचे काय खाली मुंडी वर पाय, एक रकमी एफ आर पी मिळालीच पाहिजे., तोडणी मजूर महामंडळ झालेच पाहिजे, साखरेचा भाव 35 रुपये झालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडण्यात आला .

यावेळी आंदोलकांसमोर बोलताना स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राम राजोळे म्हणाले, कारखानदार आंदोलन मोडीत काढण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र कारखानदारांचे षडयंत्र आम्ही यशस्वी होवू देणार नाही आम्ही शेतकऱ्यासाठी लढत आहोतच पण वाहतूकदारांच्या साठी तोडणी मजूर महामंडळाची स्थापना व्हावी यासाठी प्रयत्न करत आहोत गंडा घालणाऱ्या मजुराच्या शोधासाठी राज्य व्यापी पोलीस पथक निर्माण करावे यासाठीही आमचे प्रयत्न सुरू आहेत साखरेची किंमत 35 आणि इथनॉल ची किंमत 65 रुपये व्हावी यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत आम्ही शेतकरी, वाहतुकदार ,मजूर आणि साखर मागण्यासाठी संघर्ष करत आहोत. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राम राजोळे, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गणेश दाभाडे, रुपेश पगार ,गणेश गंधे, माणिक कुटे, शेतकरी सुदर्शन राजोळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते जमले होते.



# गौलखेड गावामध्ये माणुसकी जिवंत आहे !

## प्रकल्पग्रस्त लोकांसाठी मुरलीधर पाटील व देविदास पाटील ठरले आदर्श व प्रेरणास्थान

आधुनिक केसरी न्यूज

**गौलखेड :** मोह, माया, ममता, पैसा यामध्ये लोक पुर्णतः गुतून गेले आहे. पैसा म्हणजे सर्व काही या अर्विभावात लोक जगताना दिसतात. पैशासाठीच भाऊ भावाचा वैरी होतो. पैशामुळेच नातेवाईकामध्ये दूरावा निर्माण होतो. पैशामुळेच माणूस माणसापासून दूर जाताना आपण पाहतो. पण समाजात अजूनही काही लोक असे आहेत की पैशापेक्षा ते माणूसकिला महत्त्व देतात. प्रामाणिकपनाला आपलसे करतात. नितीमत्तेला जवळ धरतात. असे लोक खऱ्या अर्थाने समाजासमोर एक आदर्श निर्माण करतात, अशीच काहिशी घटणा घडली आहे जळगाव जामोद तालुक्यातील गौलखेड गावामध्ये.

गाव तस लहान. जेमतेम दोनशे ते अडीचशे वस्तीचे. गावात पाटील समाजाचा भला मोठा वाडा. ऐकेकाळी आजूबाजूच्या परासरात त्यांचा मोठा दरारा होता. गावातील गोरगरीबासाठी त्याचा मदतीचा हात नेहमी वर असयचा. त्याचा तो रूबाब आजही कायम तसाच आहे.पुर्वी एक म्हण प्रचतील होती गावात पडले मढे अन् पाटलाले पडले कोढ आणि ती म्हण पुर्वी आणि आजही लागू पडते. गावात कुणाला कशाची मदत लागली तर किंवा एखादी विपरित घटणा घडली गावातील पाटीलच त्यामध्ये लक्ष द्यायचे. झाले असे की मुरलीधर पाटील, देवीदास पाटील, महादेव पाटील यांचे नावावर पाच एकर शेती होती. त्यांनी ती शेती उत्तम झनके आणि तीवडीचे बाबुराव सुरडकर यांना विकली. पण त्यांनी शेताची खरेदी मात्र केली नाही. शेत ताब्यात घेतले आणि दरवर्षी शेत पेरायचे. शेत घेऊन त्यांना पंचविस वर्षाच्या वर दिवस झाले असतील. शेत देविदास पाटील आणि मुरलीधर पाटील यांच्याच नावावर होते. उत्तम झनके आणि बाबूराव सुरडक हे दोन लोक फक्त जमीन कसत होते. गेल्या पंचवीस वर्षांपासून हे असेच चालू होते. पण 2008 साली पूर्णा नदीवर जीगाव प्रकल्पाला मान्यता भेटली आणि धरणाचे काम सुरू झाले. त्यामध्ये गौलखेड शिवातीलही जमीन गेली. जमिनीचा चांगला मोबदला मिळावा



म्हणून लोकांनी पेरू, लिंबू यांची लागवड शेतात केली. त्याचा शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळाला. गौलखेडचा अवॉर्ड झाला आणि कोणाला किती रूपये मिळणार जाहिर झाले. उत्तम झनके आणि बाबुराव सुरडकर यांनी घेतलेल्या पाच एकराचे संत्तर लाखाच्या जवळपास पैसे मंजूर झाले. शेत यांच्या नावावर नव्हते त्यामुळे पैसे मिळण्याचा काही विषयच राहिला नव्हता.पण मुरलीधर पाटील आणि देविदास पाटील खऱ्या अर्थाने त्यांच्यासाठी देवदूत ठरले. त्यांनी जीगाव प्रकल्पाच्या माध्यमातून मिळालेले पाच एकराचे संत्तर लाख रूपये उत्तम झनके आणि बाबुराव सुरडकर यांना दिले. एक रूपयासुध्दा त्यातील घेतला नाही. त्यामुळे उत्तम झनके आणि बाबुराव सुरडकर यांच्यासह त्यांचा कुटुबातील परिवाराला खूपच आनंद झाला आहे. ही माहीती गौलखेड गावासह आजूबाजूच्या परिसरात वाऱ्यासारखी पसरली. त्यामुळे मुरलीधर पाटील व देविदास पाटील यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. अशी माणसं या जगात शोधून सापडत नाहीत. प्रामाणिक पणाचे हे जीवंत उदाहरण आहे. प्रकल्पग्रस्त लोकांसाठी मुरलीधर पाटील व देविदास पाटील एक आदर्श व प्रेरणास्थान ठरले आहे. अजूनही माणुसकी जीवंत आहे याचे जीवंत उदाहरण आहे.त्यामुळेच अशा व्यक्तींचा, त्यांच्या कतृत्वाचा यथोचीत सन्मान सर्वाचे लाडके प्रसेनजीतदादा पाटील यांचे हस्ते लक्ष्मण पवार यांचे घराच्या वास्तुशांतीचे दिवशी १३ नोव्हेबर रोजी शाल, पुष्पहार व मिठाई देवून सत्कार केला. पैशापेक्षा माणूसकी मोठी आहे हेच या घटणेतून दिसून येते, त्यामुळे माणूसकी प्रामाणिकपणा अजूनही जीवंत आहे असेच म्हणावे लागेल.

# संगमेश्वर महादेव मंदिराचा विकास हाच माझा श्वास : शिवभक्त रंगनाथ महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** जामनेर तालुक्यातील देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराच्या विकासासाठी अखेरच्या श्वासापर्यंत कटिबद्ध राहील, मंदिर परिसराचा विकास हाच माझा श्वास असल्याचे प्रतिपादन काल दि. १७/११/२२ गुरुवार रोजी आजन्म भिक्षा झोळी संकल्पक श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा पुजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी केले. हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टतर्फे पोलीसदल, सैन्य दलाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज मैदानाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. येणाऱ्या काळात मेगा पोलीस भरती होणार असून मोठ्या संख्येने तरुण - विद्यार्थी भरतीची तयारी करत आहेत. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट तर्फे विद्यार्थ्यांना भरतीचा सराव करण्यासाठी निःशुल्क मैदान उपलब्ध होणार असून आज



सकाळी भूमिपूजन करण्यात आले. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट तर्फे विकास तसेच मंदिराचा जिर्णोद्धार करण्यासाठी मंदिराचे पुजारी व ट्रस्टचे अध्यक्ष शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी विजयादशमीपासून जन्मदिवसाच्या झोळीचा संकल्प केला आहे. या भिक्षा झोळीद्वारे मिळालेल्या निधीतून सदर मैदानाचे काम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. गावातील आणि पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले. यावेळी माजी जिल्हा परिषद कृषी सभापती प्रदीप लोढा, माजी पंचायत समिती सभापती बाबुराव घोंगडे, पहूर पेठचे उपसरपंच श्याम सावळे, किशोर बनकर, नगरसेवक शेंदुर्णी श्रीकृष्ण चौधरी , ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, ईश्वर हिवाळे, आकाश बनकर, पत्रकार प्रविण कुमावत, प्रभाकर लहासे, किशोर लोहार, गजानन सोनार, यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार शंकर भामेरे यांनी मानले. श्रीक्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टच्या या निर्णयाचे स्वागत होत आहे.

# कुख्यात घरफोड्या मुद्देमालासह जेरबंद; ९ पोलीस ठाण्यात १९ गुन्हे दाखल

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** जळगाव रॉड वरील हर्सूल परिसरात चोरीचे सोने विक्रीसाठी आणणाऱ्या सराईत चोरट्याला गुन्हेशाखेने २लाख ३२ हजार ८०० रु च्या मुद्देमालासह पकडून हर्सूल पोलिसांच्या हवाली केले. संतोष गणेश रामफळे उर्फ मुक्या (२४) रा. टाऊनहॉल जयभीमनगर असे चोरट्याचे नाव आहेत्याच्या ताब्यातून सोन्याची लगड, घड्याळे, महागडा कॅमेरा असा ऐवज जप्त केला शहरातील चार घरफोड्या गुन्हेशाखेने उघडकीस आणल्या त्याच्यावर शहरातील ९ पोलीस ठाण्यात रामफळे वर १९ घरफोड्याचे गुन्हे दाखल आहेत वरील कारवाई पोलीस निरीक्षक अविनाश आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय कल्याण शेळके, एएसआय शेख हबीब, पोलीस कर्मचारी विजय निकम, ज्ञानेशवर पवार, राजेंद्र साळुंके, संजय गावंन्दे यांनी पार पाडली.

# पहिल्या परिवर्तनवादी युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी वंदना भिसे-बनकर

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** येथील पुरोगामी सामाजिक, सांस्कृतिक



महासंघ आणि शांतीलाल देसरडा महाविद्यालय यांच्या संयुक्त आयोजित जानेवारी महिन्यात आयोजित करण्यात येत असलेल्या पहिल्या युवा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी वंदना जनार्धन भिसे-बनकर यांची निवड करण्यात आली आहे. वंदना भिसे या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील लोकप्रशासन विभागाच्या संशोधिका आहे.

त्यांना आतापर्यंत क्रांतिज्योती राज्यस्तरीय पुरस्कार, रोहित वेमुला जीवन गौरव पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधक पुरस्कार मिळाले आहेत. त्यांनी विविध दैनिकांतून स्त्रियांवरती वैचारिक लेखन केले आहे. या निवडीचे पत्र वंदना भिसे-बनकर यांना पुरोगामी सामाजिक सांस्कृतिक महासंघाचे अध्यक्ष समाधान दहिवाळ व प्राचार्य हसन इनामदार यांनी दिले.

# राजेंद्र फंड यांना वैद्यकरत्न पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीरामपूर :** येथील जुन्या पिढीतील लोककलेसाठी संपूर्ण



जीवन वाहून घेतलेले लोककलावंत कै.मजनुभाई शेख यांच्या नावाने दिले जाणारे विविध पुरस्कारापैकी वैद्यकरत्न पुरस्कार हा राहाता तालुक्यातील तालुका आरोग्य विभागातील आरोग्य सहाय्यक साहित्यिक राजेंद्र फंड यांना त्यांच्या आजपर्यंतच्या विविध आरोग्य जनजागृतीविषयक कार्याबद्दल जाहीर झाला आहे. त्यांनी आतापर्यंत प्राथमिक आरोग्य केंद्र ढोरजळगांव अंतर्गत वडुले खुर्द येथे आरोग्य सेवक म्हणून कार्य करत असताना लोकसहभागातून 100 पेक्षा जास्त पुरुष शस्त्रक्रिया प्रवृत्त करून वडुले- वाघोली गावाला पुरुष शस्त्रक्रियेचे गाव म्हणून ओळख निर्माण करून दिली. आरोग्य जनजागृतीसाठी कलापथकाची स्थापना करून त्याद्वारे आरोग्यविषयक विविध उपक्रम, स्वच्छता अभियान, तंटामुक्ती या विषयावर वेगवेगळे महाविद्यालयात, एनएसएस शिबिर, शाळा, गावोगावी, साहित्य संमेलन, साहित्य दिंडीसमोर त्यांचे कलापथक सादर करून आरोग्य जनजागृती केली आहे. शासनाच्या स्वच्छता अभियान मोहिमेत सहभागी होवून गांवोगांवी स्वच्छता जनजागृती केली आहे. आरोग्य जनजागृतीसाठी ध्यास हागणदारी मुक्तीचा, फायदे एन.आर. एच.एम. चे, चिकनगुनिया, हे गीत संग्रह, तर, रखमाने केले निर्मलग्राम ही एकांकिका, आरोग्य पत्रिकेद्वारे आरोग्यविषयक विविध लेखन केले आहे. ते सहसंपादित करत असलेल्या ग्रामसेवा संदेश या दिवाळी अंकातून, तसेच विविध दिवाळी अंकातून, वर्तमान पत्रातून सतत आरोग्यविषयक जनजागृती करत असतात. त्यांचे हे आरोग्यविषयक कार्य पाहून लायन्स क्लब इंटरनॅशनल यांनी त्यांना. डायबेटिक विषयक उपक्रमाच्या जनजागृतीसाठी सन्मानाचे असे कंपेजिन अँबेसेडर हे पद दिले आहे. या पदाला त्यांनी मोठ्या प्रमाणात न्याय देऊन दीड महिन्यातच तहसील कार्यालय, पंचायत समिती, भूमिअभिलेख कार्यालय, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्टेट बँक ऑफ इंडिया, प्राथमिक आरोग्य केंद्र, तालुक्यातील आशा, अंगणवाडी सेविका मेळावा, वायरमन मेळावा, महाविद्यालय व प्रवरा कम्युनिटी रेडिओ इत्यादी ठिकाणी डायबेटीक अवेरनेस मेळावे भरवून त्यामधून 5718 व्यक्तीपर्यंत लायन्स क्लब इंटरनॅशनल यांनी विकसित केलेले डायबेटिस अवेरनेस ॲप पोहचविले आहे, व त्यांनी या ॲपद्वारे स्वतः ची, नातेवाईक यांची सध्याची डायबेटिक स्थिती काय आहे हे पाहिले आहे. त्यांच्या या सामूहिक उपक्रमाने त्यांचा होम क्लब " लायन्स क्लब राहाता" आंतरराष्ट्रीय पातळीवर स्टार अवार्ड मिळवत आहे. याचबरोबर ते शब्दगंध साहित्यिक परिषदेचे प्रसिध्दीप्रमुख म्हणून, "ग्रामसेवा संदेश" दिवाळी अंकाचे सहसंपादक म्हणून काम पाहतात. त्यांच्या देडगांवचा बालाजी या धार्मिक पुस्तकावर टेलीफिल्म ही निघाली आहे. अकोले तालुक्यातील निसर्गरम्य अशा डोंगरदरीत वसलेले पर्यटनासाठी उत्तम असलेल्या फोपसंडी गावांवर लेख लिहून व्हॉट्स अप, फेसबुक द्वारे प्रसारित केल्याने ते गांव आज पर्यटनाच्या दृष्टीने प्रसिध्दीस आलेले आहे.



# मनमाड -धुळे -इंदूर रेल्वे मार्ग 3 वर्षात करूनच दाखवेन

## खासदार डॉ. सुभाष भामरे यांची पत्रकार परिषदेत माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** जिल्ह्यातील खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी मनमाड -धुळे -इंदोर रेल्वे मार्ग संदर्भात नागरिकांच्या मनात काही शंका निर्माण झाल्यामुळे पत्रकार परिषद घेण्यात आली.

प्रकल्प कुठला ही असो हा रद्द करता येत नाही. आणि मी जे बोलतो ते नक्की करतो आणि हा मनमाड -धुळे -इंदोर रेल्वे मार्ग 3 वर्षात करूनच दाखवेल असे आव्हान खासदार भामरे यांनी केले आहे. पूर्वी खासदार कोण असायचे हे जनतेलाचं माहित नसायचे परंतु मी खासदार झाल्यापासून माझ्या कामामुळे खासदाराचे महत्व लोकांना कळू लागले असे भामरे म्हणाले.मी खासदार म्हणून कुठेच कमी पडलो नाही व टेकस्टाईल प्लॅन साठी धुळ्यात 600 हेक्टर जमीन राखीव ठेवली आहे. खासदार भामरे म्हणाले की, गेल्या ४० वर्षांपासून मनमाड - मालेगाव - धुळे - इंदौर रेल्वे मार्गासाठी आपल्या भागातील जनतेची मागणी होती . त्यासाठी भरपूर लोकांनी प्रयत्न केलेत, आंदोलने झालीत .



सन २०१४ मध्ये जनतेच्या आशिर्वादाने मी खासदार म्हणून निवडून आलो. तेव्हाच मी ठरविले होते कि मनमाड - मालेगाव - धुळे - इंदौर रेल्वे मार्ग आण शिवाय मी स्वस्थ बसणार नाही . त्याप्रमाणे मी धुळे-मनमाड - मालेगाव - धुळे - इंदौर रेल्वे मार्गाचे काम पूर्ण होणार असून या मार्गाच्या पहिल्या टप्प्यामध्ये धुळे (बोरविहीर) ते नरडाणा रेल्वे मार्गाचे काम सुरु झाले आहे. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात मनमाड - मालेगाव - धुळे - नरडाणा-सेंधवा या टप्प्याचे काम सुरु होईल. त्यामुळे या रेल्वे मार्गाबाबत जनतेने कोणताही गैरसमज करु नये, अशी ग्वाही माजी केंद्रीय मंत्री तथा खासदार डॉ. सुभाष भामरे यांनी आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी , ज्येष्ठ नेते ना . नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला सुरेश प्रभू रेल्वे मंत्री झाल्यानंतर त्यांच्याकडेही पाठपुरावा केला. या रेल्वे मार्गाचे महत्व पटवून दिले. प्रभू यांनी त्या वेळेस या रेल्वे मार्गासाठी सकारात्मक प्रतिसाद देत २०१६-२०१७ च्या रेल्वे बजेटमध्ये मनमाड - मालेगाव - धुळे - इंदौर रेल्वे मार्गास मान्यता दिली व रेल्वे बजेटच्या पिंक बक मध्ये त्याची नोंद झाली . मनमाड - मालेगाव - धुळे इंदोर रेल्वे मार्गाला पहिल्यांदा मान्यता मिळाली त्याप्रमाणे या प्रकल्पासाठी १०००० कोटी रुपयाचा अंदाजे खर्च येईल. त्याप्रमाणे रेल्वे मार्गाचा सर्व व डी.पी.आर. बनविण्याची रेल्वे बोटाने तयारी केली. त्या दरम्यान गडकरी यांच्याकडे जहाज बांधणी मंत्रालय असल्यामुळे त्यांनी प्रस्ताव दिला कि जेएनपीटीला ह्या मार्गामुळे फायदा होईल तसा २०१८ ला जेएनपीटी बरोबर करार झाला . मात्र गडकरी यांच्यानंतर आलेल्या मंत्र्यांनी निधी द्यायची असमर्थता व्यक्त केली , असे खा . भामरेंनी सांगितले यानंतर मी सदर बाब पंतप्रधान नरेंद्र मोदी व तत्कालीन रेल्वे मंत्री गोयल यांच्या निदर्शनास आणून दिली तेव्हा वरील दोघांनी या प्रकल्पासाठी हा रेल्वे मार्ग रेल्वे मंत्रालय पूर्ण करेल , असे आश्वासन दिले . त्यामुळे मी या मार्गाचा भूमीपुजनाचा प्रस्तात्र पंतप्रधानांपुढे ठेवला व प्रत्यक्षात भूमीपुजन केले. सदर रेल्वेमार्गाचे पहिल्या टण्याचा भाग म्हणून धुळे नरडाणा ५०.५६ कि.मी.या कामाची सुरुवात देखील झाल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. त्यामुळे धुळेकर जनतेने मनमाड - इंदौर रेल्वे मार्गांबाबत कुठल्याही प्रकारचा गैरसमज करू नये, अशीही विनंती त्यांनी यावेळी केली. या पत्रकार परिषदेला माजी आमदार राजवर्धन कदमबांडे, भाजपाचे महानगर अध्यक्ष अनुप अग्रवाल, महापौर प्रदीप कर्पे, माजी महापौर चंद्रकांत सोनार, महिला आघाडीच्या अध्यक्षा मायादेवी परदेशी, नगरसेवक हिरामण गवळी आदी उपस्थित होते.

# वीजपुरवठा खंडित करण्याची मोहीम सुरू, वीज बिल भरा : नीरज बिदे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** व सावळदबारा परिसरातील थकीत वीजबिल वसुलीची मोहीम राबवून थकबाकी वसूल करण्याचे व थकबाकीदार ग्राहकांचा वीजपुरवठा त्वरित खंडित करण्याचे आदेश महावितरणने सर्व क्षेत्रीय कार्यालयांना दिले आहेत. औरंगाबाद परिमंडलात घरगुती, व्यावसायिक, कृषिपंप, सार्वजनिक पाणीपुरवठा, पथदिवे व इतर अशा सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडे ५ हजार ३७७ कोटींचे वीजबिल थकले आहे. त्यामुळे महावितरणने थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यास सुरुवात केली आहे. वीजबिलांच्या थकबाकीमुळे महावितरणची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे. आता जर ग्राहकांनी वीज बिल भरले नाही तर वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय महावितरणसमोर कोणताच पर्याय उरलेला नाही, असे निरज बिदे उटकार्यकारी अभियंता




सोयगाव यांनी म्हटले आहे.ग्राहकांना वीजपुरवठा करण्यासाठी महावितरणला वीज खरेदीसाठी पुरवठादारांना रोजच पैसे द्यावे लागतात. प्रचंड वाढलेल्या थकबाकीमुळे आता यापुढे थकबाकी वसूल करण्यासाठी सर्व अधिकाऱ्यांना मोहिमा राबविण्याचे निर्देश महावितरणने दिले असून थकबाकी वसुलीत कसूर करणारे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाईचे संकेतही दिले आहे. त्यामुळे सोयगाव, सावळदबारा, मोलखेडा, घाणेगांव तांडा, डाभा, टिटवी, देव्हारी, जामठी, जरंडी, बनोटी, फर्दापूर सह थकबाकीदार ग्राहकांनी आपल्या वीज बिलाचा भरणा करून त्वरित सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणच्या वतीने उपकार्यकारी निरज बिदे व सहाय्यक अभियंता योगेश जाधव यांनी केले आहे.

# गुजरात निवडणुकीसाठी काँग्रेसच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर

## अशोक चव्हाणांसह महाराष्ट्रातील चौघांचा समावेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** गुजरात विधानसभा निवडणूक 2022 साठी काँग्रेसने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये पक्षाच्या अनेक दिग्गज नेत्यांच्या नावाचा समावेश आहे. काँग्रेसकडून 40 स्टार प्रचाराकांची यादी निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आली आहे. स्टार प्रचारकांच्या यादीमध्ये काँग्रेस अध्यक्ष व गांधी कुटुंबासह देशभरातील प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार नेत्यांचा समावेश आहे. एकूण 40 प्रचारकांच्या या यादीमध्ये मल्लिकार्जून खरगे, माजी अध्यक्ष सोनिया गांधी व राहुल गांधी, सरचिटणीस प्रियंका गांधी, राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गहलोत, छत्तीसगडचे मुख्यमंत्री भुपेश बघेल, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री दिग्विजय सिंग व कमलनाथ, हरियाणाचे माजी मुख्यमंत्री भुपिंदरसिंग हुड्डा, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा प्रामुख्याने समावेश आहे. महाराष्ट्रातून



चव्हाण यांच्या व्यतिरिक्त माजी मंत्री शिवाजीराव मोघे, नसीम खान व रामकिशन ओझा यांचा या यादीत समावेश आहे. 182 सदस्यीय गुजरात विधानसभेसाठी येत्या एक आणि पाच डिसेंबरला दोन टप्प्यात मतदान होणार असून, मतमोजणी आठ डिसेंबरला होईल. या निवडणुकीसाठी काँग्रेसने जाहीर केलेल्या स्टार प्रचारकांच्या यादीत रमेश चेन्नीथला, तारिक अन्वर, बी.के. हरिप्रसाद, मोहन प्रकाश, शक्तिसिंग गोहिल, डॉ. रघू शर्मा, जगदीश ठाकोर, सुखराम राठवा, सचिन पायलट, भरतसिंग सोलंकी, अर्जुन मोडवाडिया, सिद्धार्थ पटेल, अमित चावडा, नरेनभाई राठवा, जिग्नेश मेवानी, इम्रान प्रतापगढी, कन्हैय्या कुमार, कांतिलाल भुरिया, राजेश लिलोथिया, परेश धनानी, विरेंदरसिंग राठोड, उषा नायडू, बी.एम. संदीप, अनंत पटेल, अमरिंदरसिंग राजा व इंद्रविजयसिंग गोहिल यांचाही समावेश आहे.




काही गुप्त गोष्टी
कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)



नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)

डॉ. शेख ए.एच.

नवजीवन
आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in